**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०७**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-१६ /०७/२०१०

प्रति,
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.०७मंगळवार दि. २०/०७/२०१० रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये                                अहमदनगर महानगरपालिका.

**मंगळवार दिनांक- २०/०७/२०१० ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ४३ | मागील मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०६ बुधवार दिनांक २३/०६/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ४४ | अहमदनगर महानगरपालिकेचे शहर अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. मगर एन.बी. यांनी कार्यालयीन कामकाजासाठी स्वत:चे वाहन वापरले असल्याने मा. शासन निर्णयानुसार दिनांक २२/१/२००९ ते ऑक्टोंबर २००९ अखेर कालावधीचा वाहन भत्ता त्यांना अदा करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट |
| ४५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीत शहर बससेवा सुरू करणे कामी नेमलेल्या प्रसन्ना बस लिंक्स प्रा.लि. या अभिकर्ता संस्थेचे शहर बससेवे विषयी दिनांक १८/६/२०१० चे व श्री. हेमंत ढगे- लोककार्य आणि लोकक्रांती दल, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र. १५०३ दि.२९/६/२०१० चे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ४६ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ४ मधील निर्मलनगर येथील श्री. गवळी ते श्री. ताजवे ते श्री. बाचकर ते श्री. गर्जे आणि पोलिस कॉलनी अंतर्गत तसेच दत्त दिंगबर सोसायटी अंतर्गत ३०० एम.एम. व्यासाची एन.पी.-२ आर.सी.सी. पाईप गटर करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १०,९९,०५३/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट |

...२

| | |
|---|---|
| ४७ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १४ मधील बोल्हेगांव येथे नगर-मनमाड रोड पासून (मुख्य जलवाहिनी ) ते साळवे नगर दरम्यान १५० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईप टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ४८ | श्री. भिमाजी नारायण शिंदे, रा. वैदूवाडी वॉर्ड क्र. ५३ यांचे नावावर नळ कनेक्शन नसलेने त्यांची सन-२००९-२०१० अखेर व २०१०-२०११ ची एकूण पाणीपट्टी रूपये १०,०१३/- (बील क्रमांक ५४७ अ) निर्लेखित करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४९ | अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागामध्ये कार्यरत असलेल्या मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास सहामहिने कालावधी करिता मुदतवाढ देणेस व त्याकामी येणारे रक्कम रूपये २९६०००/- चे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५० | अहमदनगर महानगरपालिकेचे गणवेष पात्र कायम पुरूष कर्मचारी यांनी गणवेष वाटप करणे करिता गणवेष कापड खरेदी व गणवेष शिलाई करणे कामी जाहिर निविदा मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रूपये १९,५९,५८७/- चे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५१ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे डॉ. श्री. सुभाष फिरोदिया, श्री. डॉ. अनिरूध्द गिते, व श्री.डॉ. सुचति तांबोळी यांची बालरोग तज्ञ म्हणून दिनांक २६/६/२०१० ते दि.२५/१२/२०१० अखेर सहा महिन्याकरिता दरमहा मानधन रूपये १५००/- चे मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेस व त्याकामी येणारे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- १] मागील मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०६ बुधवार दिनांक २३/०६/२०१० रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय-क्रमांक- ४४ ते ५१ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- ४३ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

ठराव क्रमांक- ४३ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** मागील मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०६ बुधवार दिनांक २३/०६/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मागील मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०६ बुधवार दिनांक २३/०६/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मागील सभा दिनांक २३/६/२०१० रोजीचे सभेचे कार्यवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यांत यावे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०६ बुधवार दिनांक २३/०६/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०७**

विषय क्रमांक- ४४ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

ठराव क्रमांक- ४४ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. मगर एन.बी. यांनी कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरले असल्याने मा. शासन निर्णयानुसार दिनांक २२/१/२००९ ते ऑक्टोंबर २००९ अखेर कालावधीचा वाहन भत्ता त्यांना अदा करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा मोटार व्हेईकल विभाग दि.

विषय :-अहमनगर महानगरपालिकेचे शहर अभियंता या पदावर कार्यरत असलेले अभियंता श्री.एन.बी. मगर यांना कार्यालयीन कामकाजाकरिता वाहन वापराचा प्रतिपूर्ती भत्ता मिळणे बाबत.

संदर्भ :- १) श्री. एन.बी. मगर शहर अभियंता यांचा दि. ६/११/०९ चा अर्ज

२) सा.प्र.वि. जा.क्र. ४८९९ दि.२२/१/०९ अन्वयेचा कार्या.आदेश

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५ दि.२२/१/०८

४) शासन निर्णय क्र. वाहन १००७ /प्र.क्र. ४८ /२००७ विनियम ३१ डिसें. २००७

मा.सादर,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर की, महानगरपालिकेचे शहर अभियंता श्री.व्ही.डी.पालवे यांची बदली झाल्यानंतर संदर्भ क्र.२ नुसार श्री.एन.बी. मगर यांनी शहर अभियंता या पदाचा कार्यभार दि.२२/१/२००९ पासून स्विकारला आहे. त्यांनी यापूर्वीही महानगरपालिकेच्या नवीन स्थापनेनंतर दि.३०/६/०३ ते २४/८/०४ व १७/१/०६ ते ६/८/०७ व २७/१०/०६ ते ६/८/०७ अखेर असा तीन वेळेस शहर अभियंता या पदाचा कार्यभार सांभाळलेला आहे. त्यांनी या कालावधीत मोटार व्हेईकल विभागाकडून वेळोवेळी भाडेतत्वावरील वाहन कार्यायलीन कामकाजाकरिता वापरले होते.

उपरोक्त संदर्भ क्र.२ चे कार्यालयीन आदेशान्वये कार्यकारी अभियंता (प्र.) श्री.एन.बी. मगर यांनी दि.२२/१/०९ पासून शहर अभियंता या पदाचा कार्यभार स्विकारला असून ते सध्या याच पदावर कार्यरत आहेत. त्यांनी २२/१/२००९ पासून कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन क्र. एम.एच. १६ ए.बी. ३५१ (स्वीफ्ट मारूती) या वाहनाचा वापर केलेला असून ते सध्याही स्वतःचे वाहन कार्यालयीन कामकाजासाठी वापरत आहेत. शहर अभियंता या पदाचा कार्यभार व कर्तव्ये पाहता त्यांना आपतकालीन व्यवस्थापन, रास्ता रोको व आंदोलने तसेच शासकीय कार्यालयाकडील कार्यालयीन बैठका यासाठी समक्ष उपस्थित राहणेसाठी भाडेतत्वावरील वाहन वेळेत उपलब्ध राहणेसाठी भाडेतत्वावरील वाहन वेळेत उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होत असल्याने त्यांनी स्वतःचे वाहन वापरणे योग्य असल्याबाबत संदर्भ क्र.१ च्या पत्रात नमूद केलेले आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.३ नुसार मा. शासन निर्णय क्र. वाहन १००५/प्र.क्र.१३/२००५ / विनियम मंत्रालय, मुंबई ३२ दि.२५ मे २००५ चा आधार घेवुन मा. समिती ठराव क्र.२५ दि.२२/१/०८ अन्वये महानगरपालिकेचे अधिकारी व पदाधिकारी यांना डिझेल वाहनास १६०००/- व पेट्रोल वाहनास रू.१८०००/- याप्रमाणे ठराव पारित झालेला असून त्यानुसार मा. अधिका-यांपैकी मा.उपायुक्त(सा.) व मा.मुख्यलेखाधिकारी यांना दरमहा वाहन प्रतिपूर्ती भत्ता अदा करण्यात येत आहे. परंतु शासन निर्णय क्र.१००५/प्र.क्र. १३ /२००५/विनिमय दि.२५ मे २००५ हा पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने संदर्भ क्र.४ चे शासन निर्णयानुसार शासन निर्णय झाल्याचे दिनांकापासून अगोदर पदावर कार्यरत असलेल्या अधिका-यांना लागू ठेवून रद्द करण्यात आलेला आहे.

संदर्भ क्र.१ च्या शहर अभियंता, श्री.एन.बी. मगर यांच्या मागणीनुसार त्यांना कार्यालयीन कामकाजाकरीता वापरलेल्या स्वत:चे वाहनाचा प्रतिपूर्ती भत्ता संदर्भ क्र.३ नुसार द्यावयाचा झाल्यास २२/१/२००९ ते ऑक्टोबर २००९ अखेर प्रतिमहा रू.१८०००/- प्रमाणे एकूण रू.१,६७,८००/- इतका दयावा लागेल. तसेच मंजूर वाहनभाडे दराने दिल्यास कार्यालयीन सुट्टया सोडून प्रतिदिनी रू.४९०/- [इंधना व्यतिरिक्त ] + प्रतिदिनी वाहनाचा सरासरी वापर ३० कि.मी. व वाहनचे ॲव्हरेज १५ कि.मी. लिटर धरल्यास प्रतिदिनी २ लिटर इंधनाचा खर्च प्रतिलिटर सरासरी ४०/- रू. प्रमाणे प्रतिदिनी ८० रू. असा एकूण प्रतिदिनी ५७०/- रू. प्रमाणे आजपर्यंत ७ महिने व १६ दिवसांचे १,५९,६००/- रू. अदा करावे लागतील.

तरी वरील बाब हि धोरणात्मक व आर्थिक असल्याने तसेच भत्ता निश्चितीची असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २० चे कलम ३४६ नुसार याबाबत परिवहन समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. परंतु परिवहन समिती अस्तित्वात नसल्याने कलम ६७ चे खंड ३ [ब ] व खंड ४ [ब] नुसार त्यांचा कार्यालयीन कामकाजाचा वाहन भत्ता निश्चिती करून त्यांना या पदावर कार्यरत असे पर्यत कार्यालयीन कामकाजाचा प्रतिपूर्ती भत्ता मिळणेस तसेच त्यांचा कार्यालयीन कामकाजासाठी २२/१/२००९ पासून ऑक्टोबर २००९ पर्यत वाहन भत्ता एकूण रू.१,५९,६००/- त्यांना अदा करणेस मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे उचित वाटते. तथापी आपले पुढील योग्य त्या आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे मोटार व्हेईल विभाग प्रमुख यांचा अहवाल असे. दि.२७/११/०९

मा. शहर अभियंता :- अहवालानुसार मी स्वत: महानगरपालिकेच्या विविध कामासाठी दि.२२/१/०९ पासून (शहर अभियंता पदाचा कार्यभार घेतल्यापासून) माझे स्वत:चे वाहन MH १६ AB ३५१ वापरले आहे. मला आपत्कालीन व्यवस्थापन, रास्ता रोको, आंदोलन , वेगवेगळया शासकीय बैठका, मनपाचे विविध कामे पहाणी या कामासाठी महानगरपालिकेचे भाडेतत्वावरील वाहन वेळेवर उपलब्ध होत नाही. त्यामुळे मी स्वत:चे वाहन वापरले आहे. तरी मला अहवालानुसार वाहन भत्ताची रक्कम मिळावी ही विनंती. दि.२७/११/०९

मुख्य लेखा परिक्षक :- <u>शहर अभियंता यांना स्वत:चे वाहन वापरणे बाबत मंजूरी आहे.</u> दि. २२/१/०९ ते ऑक्टो.०९ अखेर स्वत:चे खाजगी वाहन वापरल्याचे दिसून येते. स्वत:चे खाजगी वाहन वापरण्यास खर्च रू.१,६७,८००/- इतका येतो. परंतु भाडयाने वाहन वापरलेस खर्च रू. १,५९,६००/- इतका येईल शहर अभियंता यांनी कमी रकमेची म्हणजे रू.१,५९,६००/- ची मागणी केलेली आहे. त्यांचे कामाचे स्वरूप विचारात घेवुन श.अ. यांना रू. १,५९,६००/- मंजूर करणेबाबत मा.स्थायी समिती पुढे मान्यतेसाठी सादर करणे योग्य दि. ३/१२/०९/ **<u>अ</u>**

मुख्य लेखा अधिकारी :- शहर अभियंता पदांसाठी वाहन अनुज्ञेय आहे. महापालिकेने त्यांना खाजगी वाहन उपलब्ध करून न दिल्याने श्री. मगर यांनी त्यांचे स्वत:चे खाजगी वाहन मनपा कामासाठी वापरले असल्याचे दिसुन येते. त्यांनी २२ जानेवारी ०९ पासून वाहन भत्ता व तदनुषंगिक खर्चाची मागणी केली आहे. सदर बाब मा. स्थायी समितीचे अधिकार क्षेत्रात असल्याने त्यांचे मान्यतेसाठी तथा निर्णयास्तव प्रस्ताव सादर करणे योग्य राहील. दि.३/१२/०९

मा.उपायुक्त (कर) साहेब :- प्रस्तावीतबाबत शहर अभियंता यांना वाहन अनुज्ञेय आहे. **"अ"** नुसार शहर अभियंता व इतर अनुज्ञेय अधिकारी यांना स्वतःचे वाहन वापरणेबाबत मा. शासन निर्णय क्र. वाहन १००५/प्र.क्र..१३/२००५ /विनिमय मंत्रायल, मुंबई-३२ दि.२५ मे २००५ नुसार वाहन वापराबाबत प्रतीपूर्ती देणे बाबतचा धोरणात्मक स्वरूपाचा निर्णय मु.प्रां.म.न.पा. अधिनियम १९४९ कलम ६७(३) नुसार मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ सादर करणे योग्य.

तथापी यापूर्वीच्या कालावधीतील वाहनवापराबाबतची प्रतीपूर्ती देणेयोग्य राहणार नाही अशी धारणा आहे.सबब मा.स्थायीसमितीसमोर निर्णयार्थ सादर करणेच्या मान्यतेस्तव सादर /**अ**

मा.आयुक्त साहेब :- **"अ"**मान्य स्थायी समिती समोर ठेवा. दि.१५/०१/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- वाहन प्रतिपूर्ती भत्ता बाबत मा. शासनाचा निर्णय काय आहे त्यांची माहिती द्यावी.

मा.श्री.बारस्कर पो.ज.:- मो.व्हे.विभागाचे प्रमुख श्री. निकम हे सभेमध्ये उपस्थित नाहीत. त्यांना विचारावयाची माहिती त्यांनीच देणे आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णयासाठी घेण्यात यावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- सदर प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णयासाठी घेण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढील सभेमध्ये निर्णयासाठी घेण्यात यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. मगर एन.बी. यांनी कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरले असल्याने मा. शासन निर्णयानुसार दिनांक २२/१/२००९ ते ऑक्टोंबर २००९ अखेर कालावधीचा वाहन भत्ता त्यांना अदा करणेस मंजूरी मिळणे बाबतचा सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीचे पुढील सभेमध्ये निर्णयासाठी घेण्यांत यावा.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमादेक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानमुते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०७**

विषय क्रमांक-४५ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

ठराव क्रमांक -४५ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत शहर बससेवा सुरू करणे कामी नेमलेल्या प्रसन्ना बस लिंक्स प्रा.लि. या अभिकर्ता संस्थेचे शहर बससेवे विषयी दिनांक १८/६/२०१० चे व श्री. हेमंत ढगे-लोककार्य आणि लोकक्रांती दल, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र. १५०३ दि.२९/६/२०१० चे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा मोटार व्हेईकल विभाग/जा.क्र/ दि.२४/०६/२०१०

विषय :- शहर बससेवे विषयी प्रसन्ना बस लिक्स प्रा.लि. यांचे दि.१८/६/१० चे पत्राबाबत.

मा.सादर,

अहमदनगर महानगरपालिका शहर हद्दीत शहर बससेवा सुरू करणेकामी अभिकर्ता संस्था म्हणून प्रसन्ना बस लिंक्स प्रा.लि. या संस्थेची मा.स्थायी समितीने निवड केली आहे. अहमदनगर महानगरपालिका व प्रसन्ना ट्रॅव्हल्स यांचे मध्ये शहर बससेवेबाबत करारनामा अटी व शर्तीसह करणेकामी प्रसन्ना ट्रॅव्हल्स प्रा.लि. यांना पत्र देवुन फॅक्सदेखील करण्यांत आलेला आहे.

प्रसन्ना ट्रॅव्हल्स यांनी दि.१८/६/१० रोजी इकडेस पत्र दिले असून त्यानुसार

१] प्रसन्ना ट्रॅव्हल्स प्रा.लि. यांनी बससेवेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेकडे देवुन एक वर्षापासून जास्त दिवस झाल्याने व अचानक प्रस्तावास मान्यता दिल्याने त्यातील मुद्दे चर्चेला आले नाहीत.

२] प्रसन्ना ट्रॅव्हल्सचा बससेवेबाबतचा प्रस्ताव व महानगरपालिका अटी / शर्ती मध्ये प्रचंड तफावत असून प्रसन्ना ट्रॅव्हल्स त्यांचे प्रस्तावानुरूप काम करू इच्छित आहे.

प्रसन्ना ट्रॅव्हल्स महानगरपालिकेचे अटी- शर्तीचे अधिन राहून शहरामध्ये बससेवा चालू इच्छित नसल्याबाबत पत्र प्राप्त झालेले आहे.

शहर बससेवेकरीता प्रसन्ना ट्रॅव्हल्स प्रा.लि. यांची अभिकर्ता संस्था म्हणून नेमणूक करण्यांत आलेली असून महानगरपालिकेच्या अटी / शर्ती मान्य नसल्याबाबत पत्र दिले आहे.

शहर बससेवा सुरू होणेकामी महानगरपालिकेने अथक प्रयत्न चालू केलेले आहेत. वृत्तपत्रे, सामाजिक संस्था पदाधिकारी नागरिक यांची देखील बससेवा सुरू होणे बाबत मागणी चालू आहे. तथापी प्रसन्ना ट्रॅव्हल्स यांनी पत्र देवुन असमर्थता व्यक्त केल्याचे दिसून येते. शहर बससेवेबाबत अटी / शर्ती स्थायी समितीने मंजूर केलेल्या आहेत. प्राप्त पत्रा विषयी विचार विनिमय होवुन निर्णय मा. स्थायी समितीने घेणे उचित वाटते. तरी सदरबाबत निर्णय होणेकामी पत्रासह प्रकरण मा. स्थायी समितीकडे पाठवावे किंवा कसे ? याबाबत पुढील योग्य त्या आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल विभाग प्रमुख यांचा अहवाल असे दि.२८/६/१०

मॅकेनिकल इंजि. :- प्रसन्ना ट्रॅव्हल्स प्रा.लि. यांचे पत्र मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणणे योग्य. आदेशार्थ सादर. दि. २८/६/२०१०/**अ**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** नुसार मा.स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करणेच्या मान्यतेस्तव सादर दि. ०१/०७/२०१०

मा.आयुक्त साहेब :- श्री. हेमंत ढगे यांनी १५ जुलै पर्यत बससेवा सुरू न झाल्यास मंत्रालयापुढे घात करून घेण्याची शासनास नोटीस दिली आहे, तरी शासनाचे पत्र व प्रसन्ना ट्रॅव्हल्सचे पत्रासह प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे फेरविचारार्थ पाठवा व तसा अहवाल शासनास पाठवा. दिनांक २/७/२०१०

मा.उपायुक्त (कर) साहेब :- मॅकेनिकल इंजिनिअर मा.आयुक्त यांचे निर्देशानुसार तात्काळ प्रस्ताव तयार करून सादर करावा. दि. २/०७/२०१०

--**--

अहमदनगर महानगरपालिका
मोटार व्हेईकल विभाग
दिनांक २/७/१०

मा. फेर सादर,

संदर्भ :- लोककार्य आणि लोकक्रांती दल, महाराष्ट्र राज्य यांचेकडील
पत्र क्रमांक १५०३ दिनांक २९/६/१०

वरील संदर्भिय पत्रान्वये श्री. हेमंत ढगे, यांनी पुढीलप्रमाणे नमुद केलेले आहे " अहमदनगर शहरात गेल्या १ ते २ वर्षापासून महानगरपालिकेने बससेवा बंद केली असून बससेवा सुरू व्हावी म्हणून मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. तसेच आत्मघातीपणाची नोटीसही दिलेली होती. तद्नंतर महानगरपालिकेने प्रसन्ना ट्रॅव्हल्स, पुणे यांना बससेवेचा ठेका देणेबाबत ठराव करण्यात आलेला आहे. त्यानंतर अटी व शर्तीची मसुदे तयार करण्यात आले, महानगरपालिकेच्या पदाधिकारी यांनी जाणीवपुर्वक जाचक अटी व शर्ती घातलेल्या आहेत.

१. बस ठेकेदाराने महानगरपालिकेस प्रतिमहा ५० हजार रूपये रॉयल्टी दयावी. २. बस घेणा-या ठेकेदाराने महानगरपालिकेस ५० लाख रूपये बँक गॅरंटी दयावी.

प्रसन्ना ट्रॅव्हल्स यांना ठेका देण्या अगोदर महानगरपालिकेने चार वेळेस निविदा जाहिर केल्या होत्या. सदर जाहिर निविदेमध्ये

१. एकूण तिकीट विक्रीच्या टक्केवारीत रॉयल्टी देणे २. एकूण महानगरपालिकेस २५ लक्ष बँक गॅरंटी देण्यात यावी.

निविदा प्रक्रिया अयशस्वी झाल्याने प्रस्ताव मागविण्यात आले होते. प्रस्ताव प्राप्त होवुनही महानगरपालिकेने निर्णय घेतला नाही दिनांक १०/३/१० रोजी आत्मघातीपणाबाबत इशारा दिल्यानंतर प्रसन्ना ट्रॅव्हल्स, पुणे यांचेकडेस ठेका देण्यात आला. मात्र ठेकेदारास जाचक अटी व शर्ती घालून दिल्या आहेत.

शहरात बससेवा सुरू नसल्याने नागरिकांना, विदयार्थ्यांना महिलांना रिक्षा चालकांकडून त्रास सहन करावा लागत आहे. म्हणून महानगरपालिकेने ठेकेदारास अटी व शर्तीमध्ये सवलत देवुन दिनांक १५/७/१० पर्यत कार्यवाही करावी "

या अनुषंगाने सादर की, शहरात बससेवा सुरू करणेकामी महानगरपालिकेने अटी शर्ती तयार करून मा.स्थायी समिती पुढे सादर केलेले होते. त्यामध्ये काही प्रमाणात बदल व सुधारणा करून मा.स्थायी समितीने बससेवेबाबत अटी व शर्ती मंजूर केलेल्या आहेत. त्यानुसार मंजूर ठेकेदार प्रसन्ना ट्रॅव्हल्स, पुणे यांना अटी व शर्ती नुसार करारनामा करून देणे संदर्भात पत्र देण्यात येवून फॅक्सदेखील करण्यात आलेले आहे. तथापी प्रसन्ना ट्रॅव्हल्स यांनी त्यांचेकडील अवास्तव अटी शर्तीचा मसुदा महानगरपालिकेस दिलेला होता.

त्याअनुषंगाने दिनांक १८/६/१० चे प्रसन्ना ट्रॅव्हल्स, पुणे यांनी महानगरपालिकेस पत्र दिलेले असून बससेवेबाबतच्या अटी व शर्तीचे मुददे चर्चेला आले नसल्याबाबत तसेच आमच्या प्रस्तावानुसारच बससेवेचे काम करू इच्छितो त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या अटी शर्तीच्या अधिन राहून बससेवा चालविणेबाबत असमर्थता दर्शविलेबाबत कळविले आहे.

करीता संदर्भीय पत्रे प्राप्त झालेले असून अटी शर्तीमध्ये सवलत देणेबाबतचा विषय व निर्णय मा.स्थायी समितीच घेवू शकते यास्तव सदरचे पत्रे व मूळ प्रस्ताव मा.स्थायी समितीचे निदर्शनास आणणेकामी मा.स्थायी समितीकडेस पाठविणेबाबत मंजुरीस्तव सादर.

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

मॅकेनिकल इंजि.:- शहर बस वाहतुक उपक्रमापोटी मा.स्थायी समिती ठराव क्र.२१ दि.२९/४/१० अन्वये पारित अटी / शर्ती , प्रसन्ना ट्रॅव्हल्स, पुणे यांना कळविण्यात आले असता, संबंधीताना पारित अटी / शर्ती नुसार काम करणेस नकार दिलेला आहे. (सोबत संबंधीताचे पत्र) तसेच शहरात लवकरात लवकर बससेवा चालू करावी व मा.स्थायी समिती ठराव क्र.२१ दि.२९/४/१० अन्वये पारित अटी / शर्ती, शिथिल कराव्यात अन्यथा याबाबत आत्मघातकीपणा करण्यात येईल. असे श्री. हेमंत ढगे यांनी कळविलेले आहे.

सबब बाबी या मा.स्थायी समितीच्या अखत्यारीत येत असल्याने,दोन्ही पत्रे मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणणे योग्य,मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.दि.२/७/१० /**अ**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- उपरोक्त नुसार **"अ"** बाबत मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणणेच्या मान्यतेस्तव सादर. दि.०२/०७/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. ५/७/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिका हद्दीत शहर बस सेवा सुरू करणे कामी नेमलेल्या अभिकर्ता संस्थेने महानगरपालिकेच्या अटी / शर्ती नुसार शहर बस सेवा सुरू करता येणार नाही. अटी / शर्ती शिथील करणे बाबत पत्र दिलेले असून अटी / शर्ती शिथिल करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज **व** मा.श्री. भोसले ग.पुं.:- मा.स्थायी समितीने मागिल सभेमध्ये बससेवेच्या अटी /शर्तीना मंजूरी दिलेली आहे तो ठराव, महानगरपालिकेने अभिकर्ता संस्थेस करारनामा करून देणेबाबत दिलेल्या पत्रावर त्याचे म.न.पा.स आलेले पत्र सभेमध्ये वाचून दाखविण्यांत यावे.

त्याप्रमाणे मा.स्थायी समिती सभा क्रमांक ५ दिनांक २९/०४/२०१० ठराव क्रमांक २१ व अभिकर्ता संस्थेचे अटी/ शर्ती बाबतचे पत्र सभेमध्ये वाचून दाखविण्यात आले.

मा.उपायुक्त (कर) डॉ.श्री. जावळे साहेब :- महानगरपालिकेने शहर वाहतुक बससेवा सुरू करणेकामी मंजूर केलेल्या अटी / शर्ती नुसार अभिकर्ता संस्थेस पत्र देण्यांत आले होते. त्यावर दिनांक १८/६/२०१० रोजी त्यांनी महानगरपालिकेचे अटी / शर्तीचे अधिन राहून शहरामध्ये बससेवा चालक इच्छित नसेलबाबत व श्री. हेमंत ढगे- लोककार्य आणि लोकक्रांती दल महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २९/६/२०१० चे दिलेल्या पत्रामध्ये महानगरपालिकेने बससेवे बाबत जाचक अटी दिले बाबत व अटी / शर्ती कामी करणेबाबतचे पत्रानुसार प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे पुढे सादर केलेला आहे. असून अभिकर्ता संस्थेने दिलेल्या अटी / शर्तीच्या मुद्दयावर चर्चा करून मा. सभेने निर्णय घ्यावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- आपण अटी / शर्ती वर चर्चा करून प्रस्ताव मंजूर केले नंतर त्यांना पुन्हा कळवावे लागेल. तरी ही त्यांनी शहर बससेवा सुरू करणेची कारवाई तातडीने केली नाही तर त्यामध्ये वेळ जाईल.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समितीचे निर्णयानुसार बससेवा सुरू करणे बाबत तातडीने कार्यवाही करण्यांत यावी.

मा.उपायुक्त(कर) डॉ.श्री.जावळे साहेब :-शहर बसवाहतुकीचे महानगरपालिकेचे मुळ प्रस्तावामध्ये अटी/शर्ती व प्रसन्ना ट्रव्हल्स प्रा.लि.यांनी दिलेल्या अटी / शर्तीचे प्रत्येक मुद्दयावर चर्चा करून मा.सभेने निर्णय घ्यावा. श्री.तडवी- मोटार व्हेईकल विभाग यांनी मुळ प्रस्तावातील मुद्दयांचे व अभिकर्ता संस्थेच्या अटींचे वाचन करावे.

श्री.तडवी मो.व्हे.विभाग :-**करारनाम्याचा कालावधी-**हा परिवहन उपक्रम दहावर्षापर्यत कार्यरत राहिल.कराराच्या कालावधीमध्ये अन्य बससेवांना अहमदनगर महानगरपालिका परवानगी देवु शकणार नाही अशी म.न.पा.चे मुळ प्रस्तावातील अट असून सदर अभिकर्ता संस्थेने हा उपक्रम १० वर्षापर्यत व ५ वर्षाची मुदतवाढ दिल्यास एकूण १५वर्षापर्यत कार्यरत राहिल. कराराच्या कालावधीमध्ये अन्य बस सेवांना अहमदनगर महानगरपालिका परवानगी देवुन शकणार नाही मात्र करारनाम्यात नमुद काहीही तरतुद असली तरी अटी / शर्तीचे उलंघन अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव करार संपुष्टात आणला गेल्यास महानगरपालिका या कामासाठी अन्य अभिकर्ता नियुक्त करेल. असे नमुद केलेले आहे.

मा.श्री.बारस्कर पो.ज.:- महानगरपालिकेचे अटी/ शर्ती नुसार हा परिवहन उपक्रम १० वर्षाचे कालावधी करितांच ठेवणेत यावा.

मा. सभापती साहेब :- मुदत १० वर्षाचीच ठेवावी.

श्री. तडवी मो.व्हे. विभाग :- **स्वामित्वधन रॉयल्टी-** महानगरपालिकेचे मुळ प्रस्तावामध्यें प्रती बस प्रति महिना रूपये ६००१/- घ्यावेत असे ठरविलेले असून अभिकर्ता संस्थेने स्वामित्वधन रॉयल्टी प्रती वर्षी प्रती बस रूपये १००१ आकारावी असे नमुद केलेले आहे.

सहा.आयुक्त श्री.देशमुख साहेब :-मा.स्थायीसमितीने अभिकर्ता संस्थेने कितीही बस सुरू केल्या तरीही त्यांचेकडून रूपये ५१०००/- स्वामित्वधन रॉयल्टी म्हणून घेण्यात यावेत.असे ठरविलेले आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- स्वामित्वधन रॉयल्टी प्रती वर्षी प्रती बस रूपये १००१/- घेण्यांत यावी.

मा.सभापती साहेबः- स्वामित्वधन रॉयल्टी रूपये १००१/-प्रतीवर्ष प्रतीबस घेण्यास मंजूरी देण्यांत यावी.

श्री. तडवी मो.व्हे. विभाग :- महानगरपालिकेचे मुळ प्रस्तावामध्ये अभिकर्ता संस्थेने बयाना रक्कम म्हणून रूपये ५०,०००/- चा डी.डी. पे ऑर्डर (राष्ट्रीयकृत बँकेचे) महानगरपालिकेच्या नावाने देणे बंधनकारक राहिल अभिकर्ता बससेवेची उचित पूर्तता करण्यांस असमर्थ ठरल्यास बयाणा रक्कम जप्त केली जाईल. अटी / शर्ती मंजूर झाले नंतर अभिकर्त्यास रू.२५लाख एवढी रक्कम बँक गॅरंटीच्या स्वरूपात सुरक्षा रक्कम म्हणून बससेवा संपे पर्यत महानगरपालिकेकडे ठेवावी लागेल सदर बँक गॅरंटीची मुदत वाढवून घेण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहिल. अभिकर्त्याच्या चुकी मुळे कोणतेही निर्माण झालेले दायित्व अदा करणेसाठी ही सुरक्षा रक्कम वापरली जाईल अशा वेळी सुरक्षा रकमेची बँक गॅरंटी १५ दिवसाच्या आंत पूर्ववत करण्याची जबाबदारी संस्थेची राहिल. अशी अट असून अभिकर्ता संस्थेने कंपनी अहमदनगर महानगर पालिकेस बयाना म्हणून रूपये ५०,०००/- चा धनादेश देईल. राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. देईल. परंतु उपक्रम सुरू झाल्याच्या एक महिन्यानंतर महानगरपालिका ही नामापात्र सुरक्षा अनामत बँक गॅरंटीचे स्वरूपात घेते वेळी बयाना रक्कम परत देईल. असे अभिकर्ता संस्थेने नमुद केले आहे.

मुख्य लेखा परिक्षक श्री. खरात व्ही.एस. :- बयाना रक्कम रूपये ५० हजार एक महिन्या नंतर परत द्यावी लागेल.

सहा.आयुक्त श्री. देशमुख साहेब :- मा.स्थायी समितीने बयाना रक्कम रूपये एक लाख व बँक गॅरंटी रूपये पन्नास लाख ठरविलेली आहे.

मा.श्री.बारस्कर पो.ज. **व** मा.श्री. पवार बा.रे.:- बयाणा रूपये पन्नास हजार व बँक गॅरंटी रूपये पंचवीस लाख घेण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- रूपये १ लाख ऐवजी रूपये ५० हजार बयाना रक्कम व बँक गॅरंटी रूपये पन्नास लाखा ऐवजी रूपये पंचवीस लाख घेण्यात यावी.

श्री. तडवी मो.व्हे. विभाग :- **प्रवासासाठी प्रवासी भाडे दर -** अभिकर्त्याने बससेवा सुरू केल्यानंतर मा.स्थायी समितीच्या मंजूरीने मा. राज्यशासनाच्या दरपत्रकाच्या निर्देशानुसार किमान व कमाल दर मा.प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, नाशिक यांचे मंजूरीने तिकीट दर लावणे त्यास बंधनकारक राहील.

प्रवासी भाडयामध्ये नियमाप्रमाणे मा.प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, नाशिक तसेच मा.स्थायी समिती यांच्या मंजूरीनुसारच फेरबदल करता येतील.

शासन नियमाप्रमाणे विद्यार्थी अंध ,अपंग यांना सवलतीचे दर व मासिक पास देणे बंधनकारक राहिल. याबाबत कुठल्याही स्वरूपाचा परतावा महानगरपालिकेकडून अभिकर्त्यास दिला जाणार नाही.

शासकीय नियमानुसार अनुज्ञेय व्यक्तींसाठी बसेसमध्ये आसन आरक्षित ठेवणे अभिकर्त्यास बंधनकारक राहिल.

शहर बस वाहतूकीच्या बसमधून विना तिकीट प्रवास करणा-या प्रवाश्याकडून नियमानुसार दंड वसूल करण्याचे अधिकार अभिकर्ता यांना राहतील.याप्रमाणे महानगरपालिकेचे मुळ प्रस्तावामध्ये अट असून अभिकर्ता संस्थेने आमच्या कंपनीने प्रवासीबस सुरू केल्यानंतर राज्यशासनाच्या कमाल व किमान दर (गृहविभाग दि.२०डिसेंबर, २००५ /अग्रहणाय२९,चीअधिसूचना)दराप्रमाणे मा.प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, नाशिक यांच्या मंजुर दर पत्रका प्रमाणे राहतील. त्याप्रमाणे दर आकारणी करून सेवा चालविली जाईल. डिझेल,ऑईल,टायर व बसेसच्या अन्य सुटया भागांच्या दरात ५%पेक्षा जास्त वाढ झाल्यास तसे कंपनीने महानगरपालिकेस किंवा मा.प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, नाशिक यांना मागणी केल्यास या प्रवासी भाडयामध्ये प्राधान्याने फेरबदल केले जातील.

या योजनेत शासनाच्या धोरणानुसार विद्यार्थी, अंध, अपंग या व्यक्तीनां फक्त स्वतःसाठी सवलत दिली जाईल. परंतु यांना दिलेल्या सवलतीच्या तिकीटांची रक्कम इतर शहरांतर्गत बस वाहतुक व एस.टी महामंडळा प्रमाणे शासनाकडून / म.न.पा. कडून परतावा स्वरूपात कंपनीला मिळावी तसेच शहरी पोलिस कर्मचा-यांस डयुटीवर असताना स्वतःच्या प्रवासासाठी मोफत सेवा उपलब्ध करून दिल्यास या बाबत इतर महानगर पालिकांप्रमाणे मा. पोलिस अधिक्षक कार्यालयाशी चर्चा करून नियमाप्रमाणे परतावा रक्कम फक्त कंपनीच्या नावानेच देण्याची व्यवस्था करावी ही विनंती आहे.

तसेच मनपा ने इतर कोणत्याही सवलती दिल्यास त्या सवलतीच्या बद्दल परतावा रक्कम मनपाने कंपनीस प्रत्येक महिन्यास द्यावी. असे कंपनीचे म्हणणे आहे.

सहा.आयुक्त श्री.देशमुख साहेबः- मा.शासन निर्णयाप्रमाणे अंध,अपंग व्यक्ती यांना बस वाहतुकीचे दरात सवलत देणे बंधनकारक राहिल.याबाबत कुठल्याही स्वरूपाचा परतावा महानगरपालिका कडून अभिकर्त्यास दिला जाणार नाही असे मा.स्थायी समितीने ठरविलेले आहे.

मा.श्री.पवार बा.रे.:- शासन निर्णयाप्रमाणे सक्षम प्राधिकरणाचे अंध, अपंगत्वाचे प्रमाणपत्र असलेले मासिक पास घेणारे अंध,अपंग व्यक्ती यांना बसवाहतुकीचे दरात सवलत देण्यांत यावी.सवलतीचे दराचे पास देण्याचे अधिकार महानगरपालिकेकडेस ठेवण्यात यावे. अंध, अपंग यांनाच सवलत देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- शासन निर्णयानुसार परतावा देण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र असलेले मासिक पास घेणारे अंध,अपंग व्यक्ती यांनाच बस वाहतुकीचे दरात सवलत देण्यांत यावी. मा.शासन स्तरावर याबाबत प्रतिपुर्ती (अनुदान) मंजूर झालेसच परतावा देण्यांत यावा. शासन स्तरावर प्रतिपूर्ती अनुज्ञेय नसेल तर अभिकर्त्यास प्रतिपुर्ती देणेत येणार नाही. प्रतिपूर्ती देणे अनुज्ञेय असेल तर मा.स्थायी समितीचे निर्णयानुसार मा.शासनाचे मंजूरीने अभिकर्ता संस्थेस अंध, अपंग व्यक्तीना बस वाहतुकीचे दरात सवलत दिले बाबतचा परतावा देण्यांत यावा.तसेच अंध,अपंग व्यक्ती करिता प्रवासासाठी मासिक पास देण्याचे अधिकार महानगरपालिकेकडेस असतील

श्री.तडवी मो.व्हे.विभाग :- बससेवर खाजगी जाहिराती करण्यांस अभिकर्त्यास परवानगी असेल मात्र नाम फलक बोर्डावर काहीही परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी. जाहिरातीचे दर निश्चित करावेत.असा महानगरपालिकेचा मुळ प्रस्ताव असुन अभिकर्ता संस्थेने बसेसवर खाजगी जाहिराती केल्या जातील.परंतु मनपा जाहिरात कराला सुट देईल.(हि सेवा असल्याने व जाहिरात कर मनपाचा असल्याने करात सुट मिळावी.)जाहिरातीपासून मिळणारे उत्पन्न कंपनीचे असेल.मात्र नामफलक बोर्डावर काही परिणाम होणार नाही याची दक्षता कंपनी कडून घेतली जाईल.अशी अट दिलेली आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- महानगरपालिकेची जाहिरात विनामुल्य करावी. असे आपण ठरविलेले आहे. अभिकर्त्याने बसवर केलेल्या जाहिरातीचे करात त्यांना सुट देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेची जाहिरात विनामुल्य करावी असे आपण ठरविलेले आहे. अभिकर्त्याने बसवर केलेल्या जाहिरातीचे करात त्यांना सुट देणेत यावी.

श्री.तडवी मो.व्हे.विभाग :- **परिवहन सेवेसाठी लागणारा कर्मचारी वर्ग वाहक /चालक-** ही परिवहन सेवा निरंतर चालू राहणेसाठी अभिकर्ता स्वतःचा कर्मचारी वर्ग वाहक/चालक इत्यादी ठेवेल.या सर्व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते किंवा मेहनताना देण्याची सर्वस्वी जबाबदारी अभिकर्त्याची राहिल.या कर्मचा-यांचा महानगरपालिकेशी काहीही संबंध असणार नाही.तसेच नियुक्त कर्मचारी वर्गास म.न.पा. आस्थापनाशी कोणताही संबध असणार नाही.त्यांना शासकीय किंवा म.न.पा.कर्मचा-यांच्या सोयी सुविधा देण्याचे महानगरपालिकेवर बंधन असणार नाही.

या सेवेसाठी कर्मचारी व अभिकर्ता यांचेमध्ये अभिकर्ता हे मालक तर कर्मचारी हे नोकर अशा प्रकारचे हितसंबध राहतील.

कोणत्याही कारणामुळे संबधित कर्मचा-यांच्या कोणत्याही रक्कमा देय असल्यास ती देण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहिल.

"परिवहन सेवेतील कर्मचारी व वाहक चालकावर पर्यवेक्षण व नियत्रंण ठेवण्याची जबाबदारी अभिकर्त्यावर राहिल. परंतू महानगरपालिका प्रशासनाने कर्मचा-यांच्या काही तक्रारी व सुचना केल्यास त्याची अभिकर्त्याकडून दखल घेतली जाईल. या कर्मचा-यांचा किंवा इतर कर्मचारी युनियनशी महानगरपालिका पदाधिका-याने अथवा अधिका-याने अथवा कर्मचारी युनियनने याबाबत चर्चा, पत्रव्यवहार व मिटींग करू नये अथवा कोणत्याही सुचना करू नयेत. याबाबत अभिकर्त्यांनी महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून दिल्यास संबधित व्यक्तीवर कार्यवाही करण्यात येईल याची महानगरपालिकेतर्फे हमी असणार आहे. याप्रमाणे महानगरपालिकेचा मुळ प्रस्ताव असून अभिकर्ता संस्थेने

"ही परिवहन सेवा निरंतर चालू राहण्यासाठी कंपनी स्वत: चा कर्मचारी वर्ग वाहक / चालक ठेवेल. या सर्व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते किंवा मेहनताना देण्याची जबाबदारी कंपनीची राहिल. नियुक्त कर्मचारी वर्गास महानगरपालिका सेवेत रूजू होण्याचा काहीही हक्क असणार नाही. या सेवेसाठी कर्मचारी व कंपनी यांच्यामध्ये कंपनी हे मालक तर कर्मचारी हे नोकर अशा प्रकारचे हितसंबंध राहतील कोणत्याही कारणांमुळे संबंधीत कर्मचा-यांच्या कोणत्याही रकमा देय असल्यास ती देण्याची जबाबदारी कंपनीची राहिल. परिवहन सेवेतील कर्मचारी व वाहक चालकांवर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी कंपनीची राहिल. परंतु मनपा प्रशासनाने कर्मचा-यांच्या काही तक्रारी किंवा सुचना केल्यास त्याची कंपनीकडून दखल घेतली जाईल. या कर्मचा-यांचा किंवा इतर कोणत्याही कर्मचारी युनियनशी मनपाच्या पदाधिका-याने अथवा अधिका-याने अथवा कर्मचारी युनियनने या बाबत चर्चा , पत्र व्यवहार किंवा मिटींग करू नये अथवा कोणत्याही सुचना करू नयेत. याबाबत कंपनीने महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून दिल्यास संबंधीत व्यक्तीवर कार्यवाही करण्यात येईल याची महानगरपालिकेतर्फे हमी असावी." असे अभिकर्ता संस्थेची अट आहे.

मा.सभापती साहेब :- अभिकर्ता संस्थेची अट ही महानगरपालिकेचे अटी / शर्ती नुसार आहे.

श्री.तडवी मो.व्हे.विभाग :-**दंगल, संप, किंवा आपत्कालीन परिस्थिती -** बससेवा सुरळीत ठेवणेसाठी महानगरपालिका सर्वतोपरी सहकार्य करेल. मात्र या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारे हानी नुकसान झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. सदर काळात पोलीस संरक्षण मिळून देणे बाबत महानगरपालिका सहकार्य करेल. तथापी सरंक्षणाबाबतची रक्कम अभिकर्ता संस्थेस द्यावी लागेल.

संप,दंगल,नैसर्गिक आपत्ती, अन्यथा कोणत्याही कारणासाठी जर ही सेवा बंद राहिली तर अभिकर्त्यास त्याच्या होणा-या नुकसान भरपाईसाठी मा.स्थायी समितीच्या निर्णयास अधीन राहून कराराच्या मुदतीत वाढ करण्याबाबत विचार करण्यात येईल. मात्र त्याबाबत कोणतीही प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहणार नाही. याप्रमाणे म.न.पा.चा मुळ प्रस्ताव असून अभिकर्ता संस्थेने

बससेवा सुरळीत चालू ठेवण्यासाठी कंपनी सर्वतोपरी प्रयत्न करील या कालावधीत मनपा ला तातडीने पोलीस सरंक्षण उपलब्ध करून द्यावे लागेल. पोलिस संरक्षणाबाबत कंपनीस कोणतीही रक्कम देय असणार नाही. परंतु संप, दंगल, नैसर्गिक आपत्ती ,अन्यथा कोणत्याही कारणासाठी की ज्याच्यावर आमच्या कंपनीचे कोणतेही नियंत्रण असणार नाही. अश्या कारणांसाठी जर ही सेवा बंद राहिली तर कंपनीच्या नुकसान भरपाई साठी कराराच्या मुदतीत योग्य ती वाढ केली जाईल. अभिकर्ता संस्थेची अशी अट नमुद केलेली आहे.

मा.श्री.पवार बा.रे.:- मात्र कंपनीचे नुकसान भरपाई साठी कराराच्या मुदतीत वाढ करणेबाबतचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणासमोर कंपनीने सादर केल्यास कराराच्या मुदतीत योग्य ती वाढ करणेबाबत कार्यवाही केली जाईल. याप्रमाणे अट मंजूर करावी.

मा.सभापती साहेब :-दंगल संप किंवा आपतकालीन परिस्थिती मुळे बस सेवा बंद राहिल तर कंपनीच्या नुकसान भरपाई साठी कराराच्या मुदतीत योग्य ती वाढ करणेबाबत चा प्रस्ताव कंपनीने सक्षम प्राधिकरणासमोर सादर केल्यास कराराच्या मुदतीत योग्य ती वाढ करणेबाबत कार्यवाही केली जाईल. याप्रमाणे अटीस मंजूरी देण्यांत यावी.

श्री.तडवी मो.व्हे.विभाग:-**वाहनतळ/ऑफिस/वर्कशॉप-**अभिकर्ता संस्था यांना वाहनतळ,वर्कशॉप, ऑफिस,इत्यादी करिता खुली जागा उपलब्धतेनुसार महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून देण्यात येईल.याकरिता महानगरपालिका ठरवेल असे नाममात्र भाडे अभिकर्ता संस्थेस द्यावे लागेल.

अशा जागेवर महानगरपालिकेमार्फत कोणतेही कायमस्वरूपी अथवा तात्पुरते स्वरूपाचे बांधकाम, शेड इत्यादी करून दिले जाणार नाही. अभिकर्त्यास या जागांवर कायमस्वरूपी बांधकाम करता येणार नाही. परंतू तात्पुरत्या स्वरूपाचे बांधकाम महानगरपालिका परवानगी नुसार करता येईल.

या जागेचा इतर व्यावसायिक वापर अभिकर्त्यास करता येणार नाही. असा महानगरपालिकाचा मुळ प्रस्ताव असून अभिकर्ता संस्थेने-प्रवाश्यांना बसण्यासाठी व थांबण्याकरिता बस थांब्याची, ही सुविधा एक आदर्श बस सुविधा व्हावी हया साठी सुविधायुक्त वाहनतळांची, तसेच बसेसच्या पार्किंगची व देखभाली साठी लागणा-या जागेची व्यवस्था महानगरपालिकेने अहमदनगर मध्ये योग्य ठिकाणांवर करण्याची आवश्यकता आहे. अश्या सर्व अहमदनगर शहरांतर्गत बस सेवेसाठी आवश्यक जागा महानगरपालिका कंपनीला पुरवेल व तेथील इतर सुविधा निर्माण करावयाची जबाबदारी कंपनीची राहिल व त्या बदल्यामध्ये महानगरपालिकेने हया जागेतील सर्व जाहिरात व मिळणा-या इतर उत्पन्नाचे अधिकार हया कराराची मुदत संपेपर्यत कंपनीला देण्याची व्यवस्था करावी या इतर उत्पन्न व जाहिरातीपासून मिळणा-या रकमेच्या मधुन १०% रक्कम कंपनी अहमदनगर महानगरपालिकेस देणार असल्यामुळे हया जाहिरात व इतर उत्पन्नाला मनपाने इतर कोणतेही कर आकारू नयेत.अशी अट दिलेली आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- वाहनतळासाठी आवश्यक तेवढी जागा देण्यात यावी.

सहा.आयुक्त श्री.देशमुख साहेब :-अभिकर्ता संस्था यांना मा.शासनाचे निकषाप्रमाणे महानगर पालिकेची जागा उपलब्ध होईल तेथे वर्कशॉप साठी ५०००चौ.फुट जागा व वाहनतळासाठी १०००चौ.फुट जागा आवश्यकते नुसार देणेत येईल.आवश्यकते नुसार शेड व ऑफिस खोल्यांचे बांधकाम अभिकर्ता संस्थेने स्वखर्चाने करून घ्यावे असे स्थायी समितीने ठरविलेले आहे.

मा.सभापती साहेब :- जागा उपलब्ध होईल त्याप्रमाणे ऑफिस करिता १००० चौ.फुट व वाहनतळा साठी ५००० चौ. फुट जागा उपलब्ध होईल त्याप्रमाणे देणेत यावी.

श्री. तडवी मो.व्हे.विभाग :- **तिकीटे व स्टेशनरी छपाई-** स्टेज निहाय मंजूर दराप्रमाणे तिकीटाची उपलब्धता अभिकर्त्याने स्वत: करावयाची आहे. तसेच स्टेशनरी, इत्यादी छपाई संबधित अभिकर्ता संस्थेला स्वखर्चाने करावी लागेल.

बसेसच्या तिकीटावर महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिकेची ध्येय धोरणे, जाहिराती इत्यादी छापावे लागेल.

तिकीट दरापेक्षा अधिक रक्कम वाहतूकीसाठी घेता येणार नाही. चौकशी अंती असे सिध्द झाल्यास संबधित संस्थेच्या उत्पन्नातून कपात करून घेतली जाईल याबाबत अंतीम निर्णय महानगरपालिका आयुक्त यांचा राहिल.

संबधित संस्था/ फर्म यांनी अहमदनगर महानगरपालिका यांना दैंनदिन तिकीट विक्री माध्यमातून झालेल्या एकूण उत्पन्नाच्या दैनंदिन तपशिल प्रति आठवडा अहमदनगर महानगरपालिकेकडून तपासला जाईल.असा महानगरपालिकेचा मुळ प्रस्ताव असून अभिकर्ता संस्थेने प्रवासी भाडे तिकीटे व स्टेशनरी- स्टेज निहाय मंजुर दरांप्रमाणे तिकीटांची उपलब्धता / छपाई मनपाची राहिल. कंपनी प्रति महिन्याला अहमदनगर म.न.पा.स दैनंदिन तिकीटाचा एकूण उत्पन्नाचा दैनंदिन तपशिल देईल. महानगरपालिकेकडून हा तपशिल प्रति महिन्याला तपासला जाईल. स्टेज निहाय मंजुर दरांप्रमाणे तिकीटांची उपलब्धता मनपा तर्फे करून देण्यांत येईल. इतर स्टेशनरी छपाई ,संबंधीत कंपनी स्वखर्चाने करेल. बसेसच्या तिकिटांवर महानगर पालिकेची घ्येयाधोरणे छापता येतील तसेच कंपनीस हया प्रकारच्या तिकीटांवर व इतर स्टेशनरी व छपाईवर जाहिरात करण्याचे अधिकार राहतील व त्यास मनपा ची काहीही हरकत असणार नाही. अशी अट दिलेली आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- तिकीट छपाईचा खर्च बराच येईल.

सहा.आयुक्त श्री. देशमुख साहेब :- स्टेजनिहाय मंजूर दराप्रमाणे तिकीटाची उपलब्धता अभिकर्त्याने स्वत: करावयाची आहे. तसेच स्टेशनरी इत्यादी छपाई संबंधीत संस्थेला स्वखर्चाने करावी लागेल असा आपला मुळ प्रस्ताव आहे.

मा.सभापती साहेब :- तिकीट छपाई त्यांनीच करावी. मात्र तिकीट वापराकरिता देण्यापूर्वी व पुन्हा जमा करून घेतांना महानगरपालिके मार्फत त्यांची तपासणी करण्यांत यावी.

श्री.तडवी मो.व्हे.विभाग :-अभिकर्ता संस्थेने **पोलिस संरक्षण व परिवहन खाते-** सार्वजनिक बसवाहतुक ही शहरासाठी एक अत्यावश्यक सुविधा असल्यामुळे ती सुरळीत चालावी हया साठी आमची कंपनी सर्वतोपरी प्रयत्न करेल.त्यासाठी हया सुविधेमध्ये निर्माण होणारे अडथळे दुर करण्यासाठी वेळोवेळी लागणारे पोलीस संरक्षण देण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेची असेल.तसेच हया वाहतुकीमध्ये इतर अनाधिकृत वाहने अथवा इतर वाहनांच्या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे निर्माण होणा-या अडचणी दूर करण्यासाठी महानगरपालिका पोलिस व परिवहन खाते यांच्या समन्वयाने एक पथक नेमुन हया बससेवेसाठी बसमार्ग व त्यावरील थांबे या ठिकाणी अवैध प्रवासी वाहतुक करणा-या इतर वाहनांचा उपद्रव होणार नाही याचा बंदोबस्त करेल.अशी अभिकर्ता संस्थेची अट असुन

पोलिस संरक्षण मिळवून देणेबाबत महानगरपालिका सहकार्य करेल तथापी संरक्षण बाबतची रक्कम अभिकर्ता संस्थेस द्यावी लागेल असा महानगरपालिकेचा मुळ प्रस्ताव आहे.

मा.सभापती साहेब :- पोलीस संरक्षण मिळवून देणेची व्यवस्था महानगरपालिका करेल मात्र सदर पोलिस संरक्षणाचा खर्च कंपनीनेच करावा.

श्री. तडवी मो.व्हे.विभाग :- **करारनामा समाप्त करणे-** अभिकर्त्याने अन्य कोणत्याही वेळी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ किंवा मुंबई मोटार वाहन अधिनियम १९८८ अन्वये संबंधीत अधिनियमांचे अटी / शर्तीचे उल्लंघन केल्यास संबंधीत अभिकर्त्यास एक महिन्याची आगावु नोटीस देण्यांत येईल. त्या नंतर ही कोणतेही सुधारणा न झाल्यास हि सेवा तात्काळ बंद करण्या बाबत व करार संपुष्टात आणणे बाबतचा अधिकार मा.आयुक्त यांना असेल. मा.आयुक्त यांचे निर्णयाविरूध्द अभिकर्त्यास १५ दिवसाच्या आत स्थायी समिती कडे अपिल दाखल करता येईल. मात्र या अपिलावर मा.स्थायी समितीचा निर्णय अंतिम असेल असा आपला मुळ प्रस्ताव असून अभिकर्ता संस्थेने "अभिकर्त्याने अन्य कोणत्याही वेळी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ किंवा मोटार वाहन अधिनियम १९८८अन्वये संबंधीत अधिनियमाचे अटी / शर्तीचे उल्लंघन केल्यास संबंधीत अभिकर्त्यास तीन महिन्याची आगावु नोटीस या नंतरही देवुन सुध्दा कोणतीही सुधारणा न झाल्यास हि सेवा तात्काळ बंद करणे बाबत व करार संपुष्टात आणण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना असतील मा.आयुक्त यांच्या निर्णयाविरूध्द अभिकर्त्यास ३० दिवसांच्या आंत मा.स्थायीसमितीकडे अपील दाखल करता येईल. मात्र या अपिलावरील मा.स्थायी समितीचा निर्णय अंतिम असेल अशी अट अभिकर्ता संस्थेने दिलेली आहे.

मा.श्री. पवार बा.रे. **व** मा.श्री. बारस्कर पो.ज. :- अट मंजूर करावी.

मा.सभापती साहेब :- अट मंजूर करावी. सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार शहर बस वाहतुकीचे अटी / शर्तीमध्ये सुचविलेल्या बदलाची माहिती सभेस द्यावी.

सहा.आयुक्त श्री.देशमुख साहेब :-(१) हा उपक्रम दहा वर्षाकरिताच कार्यरत राहिल.(२) स्वामित्वधन रॉयल्टी रूपये १००१/-प्रतीवर्ष प्रति बस घेण्यात यावी. (३) अभिकर्ता संस्थेकडून बयाना रक्कम रूपये पन्नास हजार व बँक गॅरंटी म्हणून रूपये पंचवीस लाख घेणेत यावेत. (४) सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र असलेले मासिक पास घेणारे अंध,अपंग व्यक्ती यांनाच बस वाहतुकीचे दरात सवलत देण्यांत यावी. मा.शासन स्तरावर याबाबत प्रतिपुर्ती (अनुदान) मंजूर झालेसच परतावा देण्यांत यावा. शासन स्तरावर प्रतिपूर्ती अनुज्ञेय नसेल तर अभिकर्त्यास प्रतिपुर्ती देणेत येणार नाही. प्रतिपूर्ती देणे अनुज्ञेय असेल तर मा.स्थायी समितीचे निर्णयानुसार मा.शासनाचे मंजूरीने अभिकर्ता संस्थेस अंध, अपंग व्यक्तीना बस वाहतुकीचे दरात सवलत दिले बाबतचा परतावा देण्यांत यावा.तसेच अंध,अपंग व्यक्ती करिता प्रवासासाठी मासिक पास देण्याचे अधिकार महानगरपालिकेकडेस असतील.(५)परिवहन उपक्रमातील बसेसवर महानगर पालिलकेची जाहिरात विनामुल्य करावी. अभिकर्त्याने बसवर केलेल्या जाहिरातीचे करात त्यांना सुट देण्यात यावी. (६) स्टेजनिहाय मंजूर दराप्रमाणे तिकीटाची उपलब्धता अभिकर्त्याने स्वतः करावयाची आहे. तसेच स्टशेनरी इत्यादी छपाई संबंधीत अभिकर्ता संस्थेला स्वखर्चाने करावी लागेल मात्र बसची तिकीटे वापरण्यापूर्वी व ती महानगरपालिकेकडेस जमा करताना महानगरपालिके कडून त्यांची तपासणी करून घ्यावी. (७) दंगल संप किंवा आपतकालीन परिस्थिती मुळे बस सेवा बंद राहिल तर कंपनीचे नुकसान भरपाई साठी कराराच्या मुदतीत वाढ करणेबाबतचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणासमोर कंपनीने सादर केल्यास कराराच्या मुदतीत योग्य ती वाढ करणेबाबत कार्यवाही केली जाईल.(८)जागा उपलब्ध होईल त्याप्रमाणे ऑफिस करिता १०००चौ.फुट व वाहनतळासाठी ५००० चौ. फुट जागा उपलब्ध होईल त्याप्रमाणे देणेत यावी.

(९) पोलिस संरक्षण उपलब्ध करून देणेसाठी म.न.पा. सहकार्य करील मात्र त्याबाबतचे शुल्क अभिकर्ता संस्थेस भरावे लागेल. (१०) अभिकर्त्याने अन्य कोणत्याही वेळी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ किंवा मोटार वाहन अधिनियम १९८८अन्वये संबधित अधिनियमांचे अटी शर्तीचे उल्लघंन केल्यास संबधित अभिकर्त्यास ३ महिन्याची आगावू नोटीस देण्यात येईल. यानंतरही कोणतेही सुधारणा न झाल्यास ही सेवा तात्काळ बंद करणे बाबत व करार संपुष्टात आणणेबाबतचा अधिकार मा.आयुक्त यांचा असेल मा.आयुक्त यांचे निर्णया विरूध्द अभिकर्त्यास ३० दिवसाच्या आत मा.स्थायी समितीकडे अपील करता येईल.मात्र या अपीलावरील मा.स्थायी समितीचा निर्णय अंतीम असेल. याप्रमाणे अटी / शर्ती मध्ये दुरूस्त्या सुचविलेल्या आहेत.

मा.श्री. पवार बा.रे. :- सुचविलेल्या दुरूस्त्यानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- सुचविलेल्या दुरूस्त्यानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते सुचविलेल्या दुरूस्तीनुसार मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिका हद्दीत शहर बससेवा सुरू करणे कामी नेमलेल्या प्रसन्ना बस लिंक्स प्रा.लि. या अभिकर्ता संस्थेचे शहर बससेवे विषयी दिनांक १८/६/२०१० चे व श्री.हेमंत ढगे- लोककार्य आणि लोकक्रांती दल,महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र.१५०३ दि.२९/६/२०१० चे पत्र व ऑफिस रिपोर्टावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेणेत येत आहे.

* हा उपक्रम दहा वर्षाकरिताच कार्यरत राहिल.

* स्वामित्वधन रॉयल्टी रूपये १००१/-(रूपये एक हजार एक फक्त) प्रतीवर्ष प्रति बस घेण्यात यावी.

* अभिकर्ता संस्थेकडून बयाना रक्कम रूपये ५०,०००/-(रूपये पन्नास हजार) व बँक गॅरंटी म्हणून रूपये २५,००,०००/- (रूपये पंचवीस लाख फक्त) घेणेत यावेत.

* सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र असलेले मासिक पास घेणारे अंध,अपंग व्यक्ती यांनाच बस वाहतुकीचे दरात सवलत देण्यांत यावी. मा.शासन स्तरावर याबाबत प्रतिपुर्ती (अनुदान) मंजूर झालेसच परतावा देण्यांत यावा. शासन स्तरावर प्रतिपूर्ती अनुज्ञेय नसेल तर अभिकर्त्यास प्रतिपुर्ती देणेत येणार नाही. प्रतिपूर्ती देणे अनुज्ञेय असेल तर मा.स्थायी समितीचे निर्णयानुसार मा.शासनाचे मंजूरीने अभिकर्ता संस्थेस अंध, अपंग व्यक्तीना बस वाहतुकीचे दरात सवलत दिले बाबतचा परतावा देण्यांत यावा.तसेच अंध,अपंग व्यक्ती करिता प्रवासासाठी मासिक पास देण्याचे अधिकार महानगरपालिकेकडेस असतील

* परिवहन उपक्रमातील बसेस वर महानगरपालकेची जाहिरात विनामुल्य करावी. अभिकर्त्याने बसवर केलेल्या जाहिरातीचे करात त्यांना सुट देण्यात यावी.

* दंगल संप किंवा आपतकालीन परिस्थिती मुळे बस सेवा बंद राहिल तर कंपनीचे नुकसान भरपाई साठी कराराच्या मुदतीत वाढ करणेबाबतचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणासमोर कंपनीने सादर केल्यास कराराच्या मुदतीत योग्य ती वाढ करणेबाबत कार्यवाही केली जाईल.

* स्टेजनिहाय मंजूर दराप्रमाणे तिकीटाची उपलब्धता अभिकर्त्याने स्वत: करावयाची आहे. तसेच स्टशेनरी इत्यादी छपाई संबंधीत अभिकर्ता संस्थेला स्वखर्चाने करावी लागेल मात्र बसची तिकीटे वापरण्यापूर्वी व ती महानगरपालिकेकडेस जमा करताना महानगरपालिके कडून त्यांची तपासणी करून घ्यावी.

* जागा उपलब्ध होईल त्याप्रमाणे ऑफिस करिता १००० चौ.फुट व वाहनतळा साठी ५००० चौ. फुट जागा उपलब्ध होईल त्याप्रमाणे देणेत यावी.

* पोलिस संरक्षण उपलब्ध करून देणेसाठी महानगरपालिका सहकार्य करील मात्र त्याबाबतचे शुल्क अभिकर्ता संस्थेस भरावे लागेल.

* अभिकर्त्याने अन्य कोणत्याही वेळी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ किंवा मोटार वाहन अधिनियम १९८८अन्वये संबधित अधिनियमांचे अटी शर्तीचे उल्लघंन केल्यास संबधित अभिकर्त्यास ३ महिन्याची आगावू नोटीस देण्यात येईल. यानंतरही कोणतीही सुधारणा न झाल्यास ही सेवा तात्काळ बंद करणे बाबत व करार संपुष्टात आणणेबाबतचा अधिकार मा.आयुक्त यांचा असेल मा.आयुक्त यांचे निर्णया विरूध्द अभिकर्त्यास ३० दिवसाच्या आत मा.स्थायी समितीकडे अपील करता येईल.मात्र या अपीलावरील मा.स्थायी समितीचा निर्णय अंतीम असेल.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने शहर वाहतुक बससेवा सुरू करणे कामी मा.स्थायी समिती सभा क्र-०५ ठराव क्रमांक २१ दिनांक २९/०४/२०१० अन्वये मंजूर केलेल्या बससेवेच्या अटी/ शर्ती मध्ये वरीलप्रमाणे अटी/ शर्तीचे दुरूस्तीसह अटी / शर्तीचे मसुदयास मंजुरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०७**

विषय क्रमांक- ४६ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

ठराव क्रमांक- ४६ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ४ मधील निर्मलनगर येथील श्री. गवळी ते श्री. ताजवे ते श्री. बाचकर ते श्री. गर्जे आणि पोलिस कॉलनी अंतर्गत तसेच दत्त दिंगबर सोसायटी अंतर्गत ३०० एम.एम. व्यासाची एन.पी.-२ आर.सी.सी. पाईप गटर करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १०,९९,०५३/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा प्रति- नगरसचिव, प्रेषक- शहर अभियंता
प्रस्तावना-विषय- प्रस्ताव मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- प्र.क्र.४ निर्मलनगर येथील गवळी ते ताजवे ते बाचकर ते गर्जे आणि पोलीस कॉलनी अंतर्गत तसेच दत्त दिगंबर सोसायटी अंतर्गत ३००एमएम. व्यासाची एन.पी.-२ आर.सी.सी. पाईप गटर करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] विषयांकित काम मा.संग्राम अरूणकाका जगताप, महापौर अहमदनगर महानगरपालिका यांनी दि.२९/६/२०१० चे यादीन्वये महापौर शहर विकास निधी अंतर्गत करणेबाबत कळविले आहे.

२] सदर कामाची शाखा अभियंता, प्रभाग अधिकारी , शहर अभियंता, उपशहर अभियंता यांचे समवेत पाहणी केली आहे. कामाची आवश्यकता असल्याचे प्रमाण पत्र मा.उपायुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी दि.२९/६/२०१० रोजी दिलेले आहे.

३] सदर कामाची अंदाजपत्रकीय तरतुद खालील प्रमाणे आहे.
लेखाशिर्ष : महापौर शहर विकास निधी रजि.क्र.१ पा.नं. १२ अ.क्र..७१
तरतुद : रू.४,००,००,०००/-
या पुर्वीचा खर्च : रू.३,४८,५९,६७१/-
प्रस्तावीत खर्च : रू.१०,९९,०५३/-
एकुण खर्च : रू. ३,५९,५८,७२४/-
शिल्लक : रू.४०,४१,२७६/-

४] कामाची निकड : सद्यपरिस्थीती मध्ये सदर ठिकाणी नागरिकांच्या घराचे सांडपाणी वाहुन जाणेसाठी कोणतीही व्यवस्था नाही तरी तेथे पाईप गटर करणे आवश्यक आहे.

५] या पुर्वी सदर ठिकाणी काम झाल्याचे वर्ष : नाही

६] गटारीची लांबी : ८८५ मीटर, व्यास- ३०० एम.एम.

८] दरसुची : म.जि.प्रा. व सा.बां.वि. सन २००९-२०१०

९] उपरोक्त काम मंजुर रेखांकनातील अंतर्गत रस्त्यावर असल्याने प्रस्तावीत काम रस्त्याच्या एका बाजुने करणेस नगररचना विभागाची हरकत नसल्याबाबत जा.क्र. टी.पी. १३६५ दि.१/७/२०१० अन्वये अभिप्राय दिलेला आहे.

सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर प्रशासकीय खर्चास मान्यतेसाठी पाठविणे बाबत मा.आयुक्त यांनी दि.२/७/२०१० अन्वये मान्यता दिल्यानुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर खर्चास मान्यतेसाठी निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि. ६/७/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ४ निर्मलनगर, पोलिस कॉलनी तसेच दत्त दिंगबर सोसायटी अंतर्गत ३०० एमएम व्यासाची आर.सी.सी. गटर करणेचे कामास व खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ४ मधील निर्मलनगर येथील श्री. गवळी ते श्री. ताजवे ते श्री. बाचकर ते श्री. गर्जे आणि पोलिस कॉलनी अंतर्गत तसेच दत्त दिंगबर सोसायटी अंतर्गत ३०० एम.एम. व्यासाची एन.पी.-२ आर.सी.सी. पाईप गटर करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १०,९९,०५३/- (रूपये दहा लाख नव्याण्णव हजार त्रेपन्न फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०७**

विषय क्रमांक- ४७ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

ठराव क्रमांक- ४७ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १४ मधील बोल्हेगांव येथे नगर-मनमाड रोड पासून (मुख्य जलवाहिनी)ते साळवे नगर दरम्यान १५०एम.एम.व्यासाची जी.आय.पाईप लाईप टाकणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ. नगर म.न.पा. सार्व. बांधकाम विभाग जा.क्र. १६ दि.२८/६/१०

प्रस्तावना-विषय- निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- प्र.क्र. १४ मधील बोल्हेगांव येथे नगर मनमाड रोड पासून (मुख्य जलवाहिनी) ते साळवे नगर दरम्यान १५० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे.

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१]प्रशासकीयमान्यता:-मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर क्र. /सुजयो/वशी/ /२०१०दि.२२/३/२०१०अन्वये मंजूरी.

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- २७,२३,१०६/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- २७,२३,१०६/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- म.जि.प्रा. व सा.बां. वि. सन २००८-२००९

६] निविदा (परिशिष्ट 'ब' ) रक्कम रू. :- २६,५९,७१०/-

७] निविदा प्रसिध्दी तारीख :- दिनांक २/४/२०१० दै. पुण्यनगरी

८] निविदा विक्री कालावधी :- ३/४/२०१० ते १९/४/२०१० (२५ दिवस)

९] निविदा स्विकारण्याची तारीख :- २३/४/२०१०

१०] निविदा उघडण्याची तारीख :-अ.क्र.१ते ३ दि.१७/५/२०१०रोजी व अ.क्र.४ ते ५ दि.२१/६/२०१० रोजी

११] कामाची मुदत :- ६ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री. अभिजीत जोशी, अहमदनगर | १५ % जादा |
| २ | श्री. म्हस्के विजय, अहमदनगर | १७.५० % जादा |
| ३ | श्री. बी.जी. गोसावी, अहमदनगर | ११ % जादा |
| ४ | श्री. शिंदे अविनाश, अहमदनगर | १५ % जादा |
| ५ | श्री. कोटमे दिपक, अहमदनगर | २० % जादा |

वरील तक्त्याच्या अनुषंगाने अ.क्र.१ ते ३ च्या निविदा मा. उपायुक्त यांचे दालनात दि. १७/५/२०१० रोजी उघडण्यात आल्या होत्या परंतु अ.क्र. ४ व ५ चे अनुक्रमे निविदा दाखल करणारे श्री. शिंदे अविनाश, अहमदनगर यांनी सदरचे काम करण्यास सक्षम नसल्याने निविदा उघडू नये असा अर्ज दाखल केला आहे. तसेच श्री.कोटमे दिपक, अहमदनगर यांनी गुजरात येथे खाजगी कंपनीत नोकरी लागल्यामुळे त्यांची निविदा उघडण्यात येवु नये असा अर्ज दिलेला आहे. त्यावर मा.उपायुक्त (कर) यांचे कडेस दि.१७/५/२०१० रोजी रिपोर्ट सादर केला असता त्यावर मा.उपायुक्त (कर) यांनी दि. ११/६/२०१० रोजी सर्व निविदा उघडण्यात याव्यात असा आदेश दिला असता अ.क्र. ४ व ५ च्या निविदा मा.उपायुक्त (सा) यांचे दालनात उघडल्या एकुण उघडण्यात आलेल्या ५ निविदा पैकी श्री. बी.जी. गोसावी, अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा ११% जादा आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक हे म.जि.प्रा. व सा.बां. वि. सन २००८-२००९ चे दरसची नुसार तयार करण्यात आले होते. तथापी म.जि.प्रा. व सा.बां. वि. सन २००९-१० च्या दरसुचीच्या सुधारित दरानुसार सदर दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जादा येतात.

तरी कमी दराचे निविदा धारकास दराचे वाटाघाटीसाठी संबंधीत ठेकेदाराला अंतिम दर लेखी कळविणे बाबत जा.क्र. ५३४ दि.२१/६/२०१० रोजी असता संबंधीत ठेकेदार यांनी दि.२१/६/२०१० रोजी सदरचे काम निविदा दरापेक्षा ५% जादा दराने काम करणेस तयार असले बाबत कळविले आहे. त्यानुसार दराचे पुथ्थकरण केले असता निविदा दराच्या ५% जादा दर दिले असता सन २००९-१० ची सुधारित दरसुचीच्या ५% जादा इतके दर येत आहेत. सदर प्रस्ताव मा.छाननी समिती समोर दि.२१/०६/२०१० रोजी ठेवला असता सदर काम निविदा दरापेक्षा ५% जादा दराने काम देणेची शिफारस करण्यात आली आहे.

सुधारित देकारानुसार मा.छाननी समितीने शिफारसीप्रमाणे सद्यस्थिती खालील प्रमाणे

| निविदा रक्कम | कमी दराचे निविदाधारक व त्यांनी अंदाजपत्रका पेक्षा भरलेला दर | प्रचलीत दरसुची नुसार येणारी रक्कम रूपये | रकाना क्रमांक ३ व ५ यामधील फरक रक्कम व % | प्रचलीत दरा नुसार होणारी % व रक्कम | मा.छाननी समितीची शिफारस मुळ निविदा दरापेक्षा |
|---|---|---|---|---|---|
| २६,५९,७१०/- | श्री.बी.जी.गोसावी ११ % जादा | २७,९२,६९५/- | निरंक % | ५ % जादा रू. १,३२,९८५/- | ५ % जादा |

सदर निविदा सन २००९-२०१०च्या सुधारित दरसुचीच्या तुलनेत ५% जादा म्हणजेच निविदा दराच्या ५%जादा दराची आहे. तरी मा.छाननी समितीने केलेल्या शिफारसी नुसार सदरची निविदा मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.२८/६/१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक १४ मधील बोल्हेगांव भागात मुख्य जलवाहिनी टाकणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्टानुसार कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार कमीचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १४ मधील बोल्हेगांव येथे नगर-मनमाड रोड पासून (मुख्य जलवाहिनी)ते साळवे नगर दरम्यान १५०एम.एम.व्यासाची जी.आय.पाईप लाईप टाकणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट पहाता तुलनात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक श्री.बी.जी. गोसावी, अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या निविदा दरापेक्षा ५% (पाच टकके) जादा म्हणजेच सन२००९-२०१० चे सुधारित दर सुचीच्या तुलणेत ५% (पाच टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयंवत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०७**

विषय क्रमांक-४८ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

ठराव क्रमांक -४८ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. भिमाजी नारायण शिंदे, रा. वैदूवाडी वॉर्ड क्र.५३ यांचे नावावर नळ कनेक्शन नसलेने त्यांची सन-२००९-२०१० अखेर व सन २०१०-२०११ ची एकूण पाणी पट्टी रूपये १०,०१३/- (बील क्रमांक ५४७ अ) निर्लेखित करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. सावेडी वसुली विभाग जा.क्र. दिनांक

सादर,

विषयः- श्री. भिमाजी नारायण शिंदे, रा. वैदुवाडी यांना नळ कनेक्शन नसताना असलेली पाणी पट्टीची आकारणी कमी करणे बाबत.

संदर्भ :- अर्जदार यांचा दि.१५/३/२०१० चा अर्ज.

उपरोक्त संदर्भाकिंत विषयाअन्वये विनंती अध्याक वार्ड क्र.५३ चे वसुली लिपीक श्री. शेख रफीक याजकडून देण्यात येतो की, श्री. भिमाजी नारायण शिंदे रा. वैदुवाडी यांनी नळ कनेक्शन नसताना ही लावण्यात आलेली पाणीपट्टीची आकारणी कमी करणे बाबत अर्ज केला आहे. सदर अर्जाप्रमाणे जागेची स्थळ पहाणी केली असता श्री. शिंदे यांना एक नळ कनेक्शन असल्याचे आढळून आले आहे. तसेच पाणीपट्टी फिटर यांनाही एकच नळ कनेक्शन असल्याचे आढळून आलेले आहे.

म.न.पा. टाचन रजिस्टर पहाता श्री. भिमाजी नारायण शिंदे रा. वैदुवाडी यांची बिल क्र.५४७ व ५४७अ यावर नावाची नोंद आहे. सदर बिल क्रमांकावर नळ कनेक्शन असल्याबाबत नोंद आहे. परंतु स्थळ पहाणी केली असता बिल क्र. ५४७ वर नळ कनेक्शन आढळून आलेले आहे व बि. क्र. ५४७ अ वर नळ कनेक्शन नसल्याचे आढळून आले आहे. तरी श्री. शिंदे यांना आकारण्यात येत असलेली दोन कनेक्शन ची पाणीपट्टी कमी करण्यास शिफारस आहे. तसेच एक नळ कनेक्शनला पाणीपट्टी आकारणी करणे उचित वाटते आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे हेडवसुली सावेडी विभाग यांचा अहवाल असे. दि

सहाय्यक आयुक्त :-हेड वसुली- सदरची डबल आकारणी केव्हापासून करण्यात आलेली आहे ?

हेडवसुली सावेडी विभाग :- फेर सादर, प्रस्तुत प्रकरणी टाचण रजिष्टरांची पडताळणी केली असता बी. नं. ५४७ अ वर भिमा नारायण शिंदे या नावाने नळ कने. ची नोंद आढळून येत नाही. परंतु सन ०७-०८ पासून सदर इसम यांचया नावाने १/२" इंची १ नळ कने. ची नोंद ही थकबाकीसह दर्शविण्यात आलेली आहे. त्यावरील बी.नं. ५४७ वर १/२" इंची १ नळ कने. ची नोंद थकबाकीसह दर्शविण्यात आलेली आहे. संबंधीत तत्कालीन लिपीक यांनी वरील बी.नं. ५४७ प्रमाणेच बी. नं. ५४७ अ ला नळ कने. नसतांना थकबाकी सारखीच आकारण्यात आलेली आहे. समक्ष पहाणी संबंधीत नळ फिटर यांनी दि.२०/३/१० रोजी केली असता बी. नं. ५४७ "अ" नळ कने. नसल्याचे आढळून आले आहे . पुढील आदेशार्थ सादर. दि.१८/६/१०

हेडवसुली सावेडी विभाग :- वॉर्ड नं.५३ चे वसुली लिपीक यांजकडून अहवाल सादर करण्यात येतो की, वॉर्ड नं.५३ मधील बी. नं. ५४७ वर नारायण लक्ष्मण शिंदे भोग-काळु नारायण शिंदे या नावाने सन २००६-०७ चे टाचण रजिस्टर पाहात नळाची नोंद आढळून आलेली आहे. परंतु बील नं. ५४७अ वर नारायण लक्ष्मण शिंदे भोग- भिमा नारायण शिंदे यांच्या नावावर नळ कने. नसताना त्यांच्या नांवावर बी. नं. ५४७ ची एकुण थकबाकी रू १००२६/- तत्कालीन

लिपीक डी.बी. बीज्जा यांनी वसुलीच्या सोईनुसार बी. नं. ५४७ ची थकबाकी व चालु बाकी ५४७ अ वर बिम्मी बिम्मी १००२६/- टाकण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष नळ फिटर मार्फत पहाणी केली असता ५४७ अ वर नळ कनेक्शन नसल्याचे आढळून आलेले आहे.

तरी बी. नं. ५४७ अ वर नळ कने. बाबत दर्शविलेली थकबाकी ५०१३ व चालु बाकी रू.१५००/- अशी आकारण्यात येवुन सन ०७-०८ पासून नळ कने.ची बाकी पुढे चालु राहिलेली आहे.

तरी बी.नं.५४७ अ वरील नळाची नोंद रद्द होण्यास व त्या नावावर सन २०१०-२०११पर्यत एकुण रू.११,०१३/- रक्कम कमी करण्याबाबत मंजुरीस्तव प्रस्ताव आदेशार्थ सादर.

सहा. आयुक्त :- सादर, सन ०६-०७ चे टाचण रजिष्टर मध्ये नळाची नोंद भोगु काळु नारायण शिंदे यांचे नावे नळ कनेक्शन दर्शविले असुन ०६-०७ अखेर थकबाकी रू.१०,०२६/- दर्शविलेली असुन बी.नं. ५४७ 'अ' वर भोग भिमा नारायण शिंदे यांचे नांवे आहे. मात्र सन ०६-०७ ला नळाची नोंद नाही सन ०७-०८ च्या टाचण रजिष्टरला लिपीक यांनी नव्याने नोंद घेवुन बील नं.५४८ व ५४८ ला वरील नावाची नोंद घेवुन मागील थकबाकी रू.५०१३ + चालु १५००/- प्रत्येकी चुकीने दर्शविलेली आहे. वास्ताविक पाहता भोग भिमा नारायण शिंदे यांनी नळ कनेक्शन घेतलेले नसल्याने त्यांचे नांवे दर्शविलेली थकबाकी काळु नारायण शिंदे यांचे नावे दर्शविणे श्री. भिमा नारायण शिंदे यांची बाकी निरंक मात्र बाकी दर्शविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सबब आदेशार्थ. दि. २२/६/१० /**अ**

मुख्य लेखा परिक्षक :- प्रस्तावीत **"अ"** नुसार पाणीपट्टी थकबाकी वर्ग करणेस मान्यता घ्यावी तथापी यामध्ये थकबाकी बरोबर येत आहे. याची पुनःश्च खात्री प्र.अ. यांनी करून अभिप्राय सादर करावे.

मा.सहाय्यक आयुक्त :- मा.उपायुक्त (कर) साहेब- फेर सादर, सदर मिळकतीस एकच नळ कनेक्शन आहे. परंतु नोंद चुकीने दोन ठिकाणी घेतलेली आहे. त्यामुळे फक्त सन ०९-१० चे टाचण रजिष्टर मधील बील नं. ५४७ भोग वरदार काळु नारायण शिंदे यांचे नांवावर असलेली थकबाकी रू.९५१३/- दर्शवुन बील नं. ५४७ अ भोग भिमाजी नारायण शिंदे यांचे नावांवर नळ कनेक्शन नसल्याने त्या नावावर दर्शविलेली चुकीची पाणीपट्टी थकबाकी ०९-१० अखेर रू.९५१३/- ही कमी करणे आवश्यक आहे. सबब आदेशार्थ. दि.२४/६/१०

मुख्य लेखा परिक्षक :- वरील **"अ"** नुसार पाणीपट्टी थकबाकी वर्ग करणेस मान्यता घ्यावी.
दि.२४/६/१०

सहाय्यक आयुक्त :- फेर सादर, बील नं.५४७ अ भोग भिमाजी नारायण शिंदे यांचे नांवावर नळ कनेक्शन नसल्याने त्यांची सन ०९-१० अखेर रू.९५१३/- व सन १०-११ ची रू. १५००/- अशी एकूण रू.१००१३/- रक्कम मु.प्रां.म.न.पा. अधि. १९४९ चे कलम १५२ प्रमाणे निर्लेखित करणे आवश्यक आहे. सबब आदेशार्थ दि.१/७/२०१०

मा.उपायुक्त (कर) साहेब :- सहमती दर्शक सही दि.०३/०७/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. ०५/०७/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- श्री. भिमाजी नारायण शिंदे, रा. वैदुवाडी, अ.नगर यांचे नावावर नळ कनेक्शन नसलेने त्यांना दिलेली पाणीपट्टी निर्लेखित करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. **व** मा.सौ. ढोणे मा.सु. :- मा.स्थायी समितीने पाणीपट्टीची चुकीची आकारणी करणारे कर्मचा-यांवर कार्यवाही करावी अशाबाबत ठराव पारित केला होत त्याप्रमाणे संबंधीतावर कार्यवाही केली आहे काय ?

आस्था. प्रमुख श्री. अशोक साबळे :- अद्यापी कार्यवाही केलेली नाही रिपोर्ट सादर केलेले आहेत.

मा.श्री.पवार बा.रे.:-महानगरपालिका हद्दीतील बोगस नळकनेक्शनची वार्ड वाईज पहाणी करणेत यावी.

मा.सभापती साहेब :- नळ कनेक्शन नसतांना चुकीची पाणीपट्टी आकारणी करणा-या कर्मचा-यांवर केलेल्या कारवाई बाबत सविस्तर माहिती पुढिल सभे मध्ये देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.चुकीची आकारणी करणा-या कर्तव्यात कसुर करणा-या संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** श्री. भिमाजी नारायण शिंदे, रा. वैदूवाडी वॉर्ड क्र.५३ यांचे नावावर नळ कनेक्शन नसलेने त्यांची सन-२००९-२०१० अखेर व सन २०१०-२०११ ची एकूण पाणी पट्टी रूपये १०,०१३/- (रूपये दहा हजार तेरा फक्त) (बील क्रमांक ५४७ अ) निर्लेखित करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच अशा प्रकारे चुकीची पाणीपट्टी आकारणी करणा-या, कर्तव्यात कसुर करणा-या संबंधीत कर्मचा-यांवर कारवाई करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयंवत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०७**

विषय क्रमांक-४९ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

ठराव क्रमांक -४९ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागामध्ये कार्यरत असलेल्या मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास सहा महिने कालावधी करिता मुदतवाढ देणेस व त्याकामी येणारे रक्कम रूपये २,९६,०००/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** नगररचना विभाग अहमदनगर दिनांक १८/५/२०१०

सादर,

विषय :- अहमदनगर महानगरपालिका स्थावर मिळकतींना नोंदी अदयावत करणेबाबत.

अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व प्रकारच्या स्थावर मिळकतीच्या नोंदी अदयावत करणे, मोजणी करणे, त्याबाबत पत्रव्यवहार करणे इत्यादी कामासाठी तज्ञ अधिकारी / कर्मचारी यांची कंत्राटी पध्दतीने जाहिर निविदा मागवुन नेमणुक करणेस स्थायी समिती महानगरपालिका अहमदनगर यांचेकडील ठराव क्र.१८ दिनांक २८/७/२००९ अन्वये मंजुरी देणेत आली आहे. त्याप्रमाणे जाहीर निविदा देणेत आली होती. सदरची जाहीर निविदा दै. लोकयुग पत्रात दिनांक २८/१०/२००९ रोजी झालेल्या प्रसिध्दीनुसार श्री. एस.बी. शिंदे- सेवानिवृत्त तहसीलदार व इतर यांनी दिलेली संयुक्त निविदा सर्वात कमी दरांची असलेने ती मंजुर करून त्यांना जा.क्र. कंत्राटी नेमणुक २६९७ दिनांक १७/११/२००९ अन्वये स्थावर मिळकत नोंदीचे सहा महिन्याचे कालावधीकरिता कामकाज देण्याचा आदेश देणेत आलेला आहे. मिळकतीच्या माहितीचे प्रपत्र सोबत जोडले आहे.

**दिनांक ७.१२.२००९ पासून पथकातील अधिकारी यांनी केलेल्या कामाचा गोषवारा खालील प्रमाणे दिलेला आहे.**

१. नगर परिषदेच्या नांवाने असलेल्या, १९९९ पुर्वीच्या व नंतर चे मंजुर रेखांकनातील खुल्या जागा रस्ते यांच्या एकुण २३३७ मिळकतीचे सात बारा उतारे संबंधीत कामगार तलाठी यांचेकडून समक्ष प्राप्त करून घेतले आहेत.

२. प्राप्त केलेल्या सात बारा उता-या प्रमाणे ४८४ मिळकतींना नोंदी करणेसाठी कामगार तलाठी यांना कळविले आहे व त्यापैकी २१७ मिळकतीला महानगर पालिकेच्या नांवाच्या नोंदी झालेल्या आहेत.

३. महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतीकडील एकुण ६१ मिळकतीची माहिती उपलब्ध झाली सदर मिळकतीना नांवाच्या नोंदी करणेबाबत तलाठी यांना कळविले आहे. त्याप्रमाणे ४८ मिळकतीना म.न.पा.च्या नांवाच्या नोंदी झालेल्या आहेत.

४. नगर भुमापन अधिकार अभिलेखात नगर परिषदेच्या नांवानेअसलेल्या खुल्या जागा, रस्ते क्रिडांगणे बगीच्या इमारती व इतर एकुण ३०८ मिळकती असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या नांवाच्या नोंदी करणे, दुरूस्ती करणे, मंजुर नगर रचना योजनेचा अम्मल घेणे, सिटी सर्व्हे लागु करणे, इत्यादी बाबतची मिळकतीची

५. २४ प्रकरणे अहमदनगर भुमापन कार्यालयाकडे कार्यवाहीसाठी पाठविली आहेत. सदरची प्रकरणे प्रलंबीत असुन निर्गतीबाबत पाठपुरावा चालु आहे.

६. मौजे पिंपळगांव माळवी येथील तलावासाठी तत्कालीन नगर परिषदेने संपादीत केलेल्या ७०० एकर क्षेत्रास महानगरपालिकेच्या नांवाची नोंद करणे बाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडेस सादर केलेला आहे तो अदयाप प्रलंबीत आहे.

७. नगर रचना योजना क्रमांक ४ मधील अंतीम भुखंड क्रमांक १११ ला महानगरपालिकेच्या नांवाची नोंद करणे बाबत मा. उपसंचालक भूमी अभिलेख नाशिक यांचेकडेस अपील दाखल केलेले असुन ते त्यांचेकडे प्रलंबीत आहे.

८. नगर रचना योजना क्रमांक ४ मधील अंतीम भुखंड क्र. १९३,१९५ ला महानगरपालिकेच्या नावांची नोंद करणेसाठी मा. अधिक्षक भुमी अभिलेख अहमदनगर यांचेकडेस अपील प्रलंबीत आहे.

९. महानगरपालिका कार्यालयातील विभाग प्रमुखांचे मागणीनुसार आतापर्यंत ११० मिळकतीची मोजणी करून हदीनिशान्या दाखवुन मोजणी नकाशे तयार करून देणेत आले आहेत.

**महानगरपालिकेच्या नांवाच्या नोंदी अदयावत करणेबाबत खालीलप्रमाणे काम शिल्लक आहे.**

१) सन १९९९ पूर्वीच्या मंजुर रेखांकनातील खुल्या जागा ५९८ व रस्ते ७५७ असे एकुण १३५५ मिळकतीस महानगरपालिकेच्या नांवाच्या नोंदी करावयाच्या आहेत. त्यासाठी ८२६ जमीन मालकांकडून रेखांकनातील क्षेत्र हस्तांतरीत करून घ्यावयाचे आहे. महसुल अधिनियमातील तरतुदीनुसार नोंदणीकत दस्तऐवज असले खेरीज मिळकती हस्तातरीत केल्या जात नाहीत. परंतु ८२६ जमीन मालक खरेदी करून घेणेसाठी हजर राहतील किंवा कसे यांची शाशंकता वाटते तसेच खरेदीचे वेळी सात बारा उता-यावर कबजेदार सदरी नांव असलेले सर्व संबंधीत हजर राहणे आवश्यक असते या प्रक्रियेस बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे खरेदीद्वारे हस्तांतरीत करून घेणे अडचणीचे आहे.

मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी बिगरशेती परवानगी दिलेल्या आदेशात जमीन मालकाने खुली जागा व रस्ते विकसीत करून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ताब्यात देणेची शर्त नमुद केलेली असलेने जमीन मालकांवर जागेचा ताबा देणे बंधनकारक आहे. त्या शर्तीनुसार ८२६ जमीन मालकांकडून प्रत्यक्ष जागेवर जावुन ताबे पावती करून घेवुन त्याप्रमाणे कामगार तलाठी यांचेकडून नोंदी करून घेणे सोईचे होईल.

२) महानगरपालिकेच्या नांवाच्या नोंदी करणेसाठी पाठविलेल्या एकुण ७२ प्रकरणात संबंधीत कार्यालयाने काही मुद्दे उपस्थित केल्यास कागदपत्र मागणी केल्यास त्याची पुर्तता करून पाठपुरावा करावयाचा आहे.

३) दुसरी सुधारित नगर विकास योजनेमध्ये एकुण १९ सरकारी जागेवर आरक्षण टाकणेत आलेले आहे. सदरच्या जागा हस्तांतरीत करून घेणेबाबत १९ प्रकरणे तयार करून मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेमार्फत शासनास सादर करावयाची आहेत. सदर मिळकती हस्तांतरीत झाल्याखेरीत ज्या ठिकाणी विकासाची कामे करता येणार नाहीत. त्यामुळे सदरचे काम महत्वाचे व तातडीचे आहे.

४) खुल्या जागा व रस्ते या मिळकतीस महानगरपालिकेच्या नांवाच्या नोंदी घेतल्यानंतर त्या मिळकतीची मोजणी करून घेणे नकाशे तयार करणे व सद्यस्थितीत तफावत आढळल्यास नगर भुमापन अधिकारी यांचेसी पत्रव्यवहार करून त्या मिळकती बाबत दुरूस्त्या करून घेणे.

द्विनोंद पध्दत पध्दतीमुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतीस नोंदीचे महत्व प्राप्त झाले आहे.खुल्या जागा व रस्ते यावर अतिक्रमणे बेकादेशीर हस्तांतर झाल्यास सदर मिळकतीस महानगरपालिकेच्या नांवाच्या नोंदी नसल्यास कायदेशीर व तांत्रिक अडचणी निर्माण होतात तसेच निधी प्राप्त होवुनही त्याठिकाणी विकासाची कामे करता येत नाहीत.मालमत्तेस नोंदी झाल्या खेरीज कोणताही कायदेशीर हक्क मिळत नाही त्यामुळे सर्व प्रकारच्या मिळकतीस नोंदी करून घेणे आवश्यक आहे.

१९९९ पूर्वीचे मंजुर रेखांकनातील एकुण १३५५ मिळकतीचे ८२६ जमीन मालकांकडून जागा हस्तांतरासाठी खरेदी करून घेणे अथवा ताबे पावती करून घेणे हे निश्चित झालेनंतर त्याप्रमाणे नोंदी करून घेणे हे काम मोठया प्रमाणावर असुन प्रतीमाह यातील ५० ते ६० प्रकरणांची निर्गती गृहीत धरल्यास या कामासाठी एक वर्षा पेक्षा जास्त कालावधी लागण्याची शक्यता आहे.

हल्ली कार्यरत असलेल्या पथकातील अधिकारी / कर्मचारी यांना देणेत आलेल्या कामाचा कालावधी दिनांक ७/६/२०१० रोजी संपुष्टात येत आहे. सध्या मंजुर निविदेतील दरानुसार पुढील कालावधीकरिता ते काम करणेस तयार आहेत. आतापर्यत नियमितपणे हजर राहुन त्यांनी मिळकतीचे नोंदी बाबत चांगले प्रकारे काम केलेले आहे त्यामुळे त्यांच्या कामाचा अनुभव विचारात घेवुन पुढील कामकाजात एकसुत्रीपणा राहुन प्रस्तावीत मिळकतीच्या नोंदीची सत्वर निर्गती करणेचे दृष्टीने कार्यरत असलेल्या पथकातील अधिकारी / कर्मचारी यांचे कडुन काम करून घेणे आवश्यक आहे. त्यांच्या निविदेतील कमी दराची रक्कम रू.२,९६,०००/- मागील सहा महिने कालावधी करिता मंजूर करण्यात आलेले आहे. त्या सरासरी प्रमाणे दरमहा रू.४९,३३०/- इतकी रक्कम त्यांना अदा करण्यात येत आहे. याच दराने त्यांना पुढील ६ महिने काम देण्याचे ठरविल्यास त्यासाठी रू.२,९६,०००/- इतका खर्च येईल. व सदर खर्चाची रक्कम मानधन (आस्थापना) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालणेस हरकत नाही.

तरी प्रस्तावीत कामाची वस्तुस्थिती व आवश्यकता विचारात घेवुन दि.८/६/२०१० पासून पुढे ६ महिन्याच्या कालावधी करिता सध्या नगररचना विभागात कार्यरत असणा-या पथकास स्थावर मिळकत नोंदी अदयावत करणेचे काम देणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे योग्य वाटते. आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

मुख्य लेखा परिक्षक :- सदरचे प्रकरण मंजूर झाल्यानंतर सहा महिने मुदती करिता मिळकत कर नोंदीचे पथकास मुदत वाढ देवुन खर्च रू.२,९६,०००/- मंजूर प्रकरण मंजूरीसाठी प्रकरण मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावे.

मुख्य लेखा अधिकारी :- प्रस्तावीत केल्याप्रमाणे मुदतवाढ देणेस व खर्चास मान्यतेस्तव द्विनोंद लेखा पध्दतीसाठी लागणारी आवश्यक माहिती मुदतीत देणे आवश्यक दि.३१/५/१०/ **अ**

मा.उपायुक्त (सा) साहेब :- **"अ"** प्रस्तावीत नुसार मान्य करणेस हरकत नाही दि.१५/५/१०

--**--

मुख्य लेखा अधिकारी :- (१) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. आरईएम/ १५०९ /प्र.क्र. ३५/२००९/१३ दि. १ जून २००९ मधील तरतुदीनुसार कोणत्याही सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-यास मा. न्यायालयाच्या पूर्व परवानगी शिवाय सेवेत मुदतवाढ किंवा पुर्ननियुक्ती करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत.

(२) तथापी उपरोक्त सेवानिवृत्त कर्मचा-यांना मुदतवाढ किंवा सेवेत पुर्ननियुक्त केलेले नाही. त्याऐवजी वर्तमानपत्रात जाहीर निविदा मागवून व स्थायी समिती ठराव क्र.१८ दि.२८/७/२००९ अन्वये मंजूरी घेवुन ठराविक कालावधीसाठी मंजूर निविदा दराने नेमणूका करण्यात आल्या आहे.

सदर बाब ही शासकीय सेवेतील मुदतवाढ तसेच पुनर्नियुक्ती या सदरात मोडत नाही. त्यांचेकडे असलेले विशिष्ट काम विचारात घेवुन मंजूर निविदा दराने स्थायी समितीच्या मंजूरीने नियुक्ती या पुढील कालावधीसाठी देणे योग्य राहील आदेशार्थ सादर. दि.१७/६/१०/**अ**

मा.उपायुक्त (सा.)साहेब :- **"अ"** प्रस्तावीत मा.स्थायी समिती कडे मंजुरीसाठी पाठविणे योग्य दि.१९/६/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२२/६/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये॑ वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये॑ झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- नगररचना विभागामध्ये कार्यरत असलेल्या मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास सहा महिन्याकरिता मुदत वाढ देणेस व खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागामध्ये कार्यरत असलेल्या मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास सहा महिने कालावधी करिता मुदतवाढ देणेस व त्याकामी येणारे रक्कम रूपये २,९६,०००/- (रूपये दोन लाख शहाण्णव हजार फक्त)चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०७**

विषय क्रमांक- ५० मंगळवार दिनांक २०/७/२०१०

ठराव क्रमांक- ५० मंगळवार दिनांक २०/७/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे गणवेश पात्र कायम पुरूष कर्मचारी यांना गणवेश वाटप करणे करिता गणवेश कापड खरेदी व गणवेश शिलाई करणे कामी जाहिर निविदा मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रूपये १९,५९,५८७/- चे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. स्टोअर विभाग दि.५/०७/२०१०

विषय- अहमदनगर महानगरपालिका कायम पुरूष कर्मचारी यांना गणवेषाकरीता लागणारे कापड खरेदी व गणवेष शिलाई करणेबाबत.

विनंती रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र पुरूष कर्मचा-यांना सन २००६-०७ ते ०७-०८ चा गणवेष वाटप करण्यात आलेला असून नगरपरिषद उपविधी प्रमाणे प्रत्येकी २ मॅनेले व २ फुल पॅन्ट २ वर्षातून एकदा देण्याची तरतुद असल्याने सन २००८-०९ ते ०९-१०या आर्थिक वर्षाचा गणवेष पुरूष कर्मचा-यांना वाटप करणे आहे तसेच गणवेषपात्र कायम वाहन चालक कर्मचारी यांना वुलन कापडाचे १ कोट व वुलन कापडाचे १ फुलपॅन्ट ३ वर्षातुन एकदा देण्याची तरतुद आहे. यापूर्वी वाहन चालक गणवेष पात्र पुरूष कर्मचा-यांना सन २००७-०८ मध्ये वुलन गणवेष वाटप करण्यात आलेला असून सन २००८-०९, सन२००९-१० व सन२०१०-११ या तीन आर्थिक वर्षातील वुलन गणवेष वाटप करणे बाकी आहे.

अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र पुरूष कर्मचा-यांना सन२००६-०७ते ०७-०८ चा गणवेष वाटप करणेकामी लागणारे कापड मा. शासन निर्णय क्र.१०८८(२५१२)उद्योग- ६ दि.-२/१/९२ मधील परिशिष्ट५(अ) मधील तरतुदीनुसार- महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित , मुंबई यांचेकडील यंत्रमागचे कापड खरेदी करण्यात आले होते. परंतु कर्मचा-यांनी सदर कापडाचे गणवेष शिलाई करण्यास नकार दिलेला असून अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून सुपेरियर क्वॉलीटी कापड नमुने मागवावीत व सदर नमुने कामगार प्रतीनिधी व युनियन प्रतीनिधी यांना दाखवून नमुने पसंती घेवून कापड खरेदी करण्यात यावी असे सुचविल्याप्रमाणे सदर कापड महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांना परत पाठविण्यात आलेले असुन महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेले सुपेरिअर क्वॉलीटी कापड नमूने व त्यांचे दर पहाता जास्तीचे असल्याने कापड खरेदीकामी जाहीर टेंडर नोटीस प्रसिध्द करून गणवेष कापड नमुन्यासह दरपत्रक मागवून कामगार प्रतीनिधी व युनियन प्रतीनिधी यांना दाखवून नमुने पसंती घेवुन रेमंड कंपनीचे कापड खरेदी करण्यात आलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र पुरूष कर्मचा-यांसाठी गणवेषाकरिता लागणारे कापड खरेदी करून गणवेष शिलाई करून वाटप करणेकामी गणवेषपात्र पुरूष कर्मचारी यांचे संपुर्ण नाव, हुद्दा व त्यांना द्यावयाच्या गणवेषाचे वर्णन इत्यादीची सविस्तर माहिती खाते प्रमुख व शाखा प्रमुख यांचेकडून मागवून घ्यावी लागेल.

तसेच वाहन चालक कर्मचा-यांना वुलन गणवेष एक फुल कोट व एक फुल पॅन्ट देणेकामी आस्थापना सुचीवरील कायम वाहन चालक कर्मचा-यांची नावासह यादी मागवून घ्यावी लागेल.

एक कर्मचा-याकरिता गणवेष शिलाईकरिता सुटींग कापड मॅनेलाकरीता पन्हा ५८" चे अंदाजे १.४० मिटर, पॅन्ट करीता पन्हा ५८" चे अंदाजे १.१५ मिटर व मॅनेलाकरीता शर्टींग कापड पन्हा ८९ से.मी. चे अंदाजे २.४० मिटर कापड लागेल तसेच वुलन गणवेष एक फुल कोट व एक पॅन्ट देणेकामी अंदाजे वुलन कापड ३.२५ मिटर व अस्तर कापड २.०० मिटर लागेल. स्टोअर विभागाकडे स्टॉक मध्ये खाकी रंगाचे कॉटन ब्लेडेड सुटींग कापड पन्हा ५८"-२८९=९० मिटर, स्काय ब्लु रंगाचे कॉटन ब्लेंडेड शुटींग कापड पन्हा ८९ सें.मी. २४=१६ मिटर, निळे वुलन कापड ३=२५ मिटर व अस्तर कापड २=०० मिटर शिल्लक आहे.

अहमदनगर महानगरपालिका पुरूष कर्मचा-यांना या पुर्वी खाकी / खाकी गोल्डन/ पांढरे/ नेव्ही ब्ल्यु/ जंगल पॉलीस्टर विसकोस सुटींग- (६७.३३%) रूंदी ५८" रेमंड/विमल/डिगजाम/रेड ॲण्ड टेलर इ. नामांकित कंपनी पैकी अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचे नमुना पसंती प्रमाणे रेमंड कंपनीचे कापडाचा नमुना पसंत करून गणवेष वाटप केलेले आहेत. तसेच वुलन कापड महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, मुंबई यांचेकडून वुलन कापड व आस्तर कापड खरेदी करून वुलन गणवेष वाटप केलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिका अंदाजे १४९१ पुरूष कर्मचा-यांना कापड खरेदी व गणवेष शिलाईकामी पुढीलप्रमाणे खर्च येईल-

| | |
|---|---|
| १४५० पुरूष कर्मचा-यांना गणवेष कापड खरेदी कामी- | अंदाजे रक्कम रू.१४,३५,४१२=०० |
| १४५० पुरूष कर्मचा-यांना प्रत्येकी दोन गणवेष शिलाई करणेकामी- | अंदाजे रक्कम रू. ४,३५,०००=०० |
| ४१ वुलन गणवेषाकरिता कापड खरेदी कामी- | अंदाजे रक्कम रू.३९,९७५=०० |
| ४१ कर्मचा-यांना वुलन गणवेष शिलाई करणेकामी- | अंदाजे रक्कम रू. ४९,२००=०० |

असे एकूण अंदाजे१४९१ कर्मचा-यांकरिता कापड खरेदी व गणवेषशिलाई कामी अंदाजेएकूणरक्कम रू.१९,५९,५८७=००फक्त (अक्षरी रू.एकोणवीस लाख एकोणसाठ हजार पाचशे सत्याऐंशी फक्त)खर्च येईल.

तरी गणवेषपात्र पुरूष कर्मचारी यांचे संपुर्ण नाव, हुद्दा व त्यांना द्यावयाच्या गणवेषाचे वर्णन इत्यादीची सविस्तर माहिती खाते प्रमुख व शाखा प्रमुख यांचेकडून मागवून अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र अंदाजे १४९१ पुरूष कर्मचा-यांसाठी गणवेष वाटप करणेकामी टेंडर फॉर्ममधील नमुद अटी शर्ती नुसार दोन लिफाफे पध्दतीने गणवेष कापड खरेदी व गणवेष शिलाई करणेकामी सिलबंद निविदा वर्तमानपत्रात, महानगरपालिका वेबसाईट व नोटीस बोर्डवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करून निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू. १९,५९,५८७=०० फक्त (अक्षरी रू. एकोणवीस लाख एकोणसाठ हजार पाचशे सत्याऐंशी फक्त) खर्चास तसेच निविदा जाहिरात प्रसिध्दीकामी येणा-या खर्चास मंजूरी मिळावी ही विनंती. आदेशार्थ सविनय सादर. /**अ**

अंदापत्रकीय तरतुद :- सन २०१०-११
गणवेष खरेदी :- रू. २८,००,०००=००
आतापर्यंत झालेला खर्च :- रू. ८,२८,८८०=००
उपलब्ध शिल्लक :- रू. १९,७१,१२०=००
प्रस्तावीत अंदाजे खर्च :- रू. १९,५९,५८७=००
प्रस्तावीत बजेट रजि. पा.नं. २१ वर नोंद असे

येणे प्रमाणे स्टोअर लिपिक यांचा अहवाल असे.

मा.स्टोअर विभाग प्रमुख :- प्रस्तावीत "अ" नुसार मंजुरीस्तव सादर दि.०५/०७/२०१०

मा.मुख्यलेखा परिक्षक :- पुरूष कर्मचारी गणवेश खरेदीसाठी निविदा इ. मागवून यासाठी खर्च रू.१९,५९,५८७/- मंजूरीसाठी दि.०७/०७/२०१०/**अ**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- निविदा प्रसिध्दीस्तव व **"अ"** नुसार कार्यवाहीस्तव मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ ठेवणे योग्य दि. ०७/०७/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.०८/०७/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे गणवेष पात्र पुरूष कर्मचा-यांना गणवेष वाटप करणे करिता गणवेष कापड खरेदी व शिलाई करणे कामी जाहिर निविदा मागविणेस व खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- कर्मचा-यांना खाकी रंगाचा ड्रेस घेवु नये.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- गणवेषाचा रंग ठरविण्यचा अधिकार मा.उपायुक्त डॉ.श्री. जावळे साहेब यांना देणेत यावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- आपण कर्मचा-यांना गणवेश देतो परंतु बरेच कर्मचारी ऑफिसमध्ये गणवेशात येत नाहीत.

मा.सभापती साहेब :- कार्यालयामध्ये गणवेषात न येणारे कर्मचा-यांवर संबंधीत विभाग प्रमुखाने कार्यवाही करावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. तसेच मा.उपायुक्त डॉ.श्री. पंकज जावळे साहेब यांना गणवेशाचा रंग ठरविण्यांचा अधिकार देण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे गणवेश पात्र कायम पुरूष कर्मचारी यांना गणवेश वाटप करणे करिता गणवेश कापड खरेदी व गणवेश शिलाई करणे कामी जाहिर निविदा मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रूपये १९,५९,५८७/- (रूपये एकोणवीस लाख एकोणसाठ हजार पाचशे सत्याऐंशी फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच मा.उपायुक्त डॉ.श्री. पंकज जावळे साहेब यांना कर्मचा-यांना देणे करितांचे गणवेशाचा रंग ठरविण्याचा अधिकार देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०७**

विषय क्रमांक-५१ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

ठराव क्रमांक -५१ मंगळवार दिनांक २०/७/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे डॉ. श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते, व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची बालरोग तज्ञ म्हणून दिनांक २६/६/२०१० ते दि.२५/१२/२०१० अखेर सहा महिन्याकरिता दरमहा मानधन रूपये १५००/- चे मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेस व त्याकामी येणारे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :** अ.नगर म.न.पा. कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह जा.क्र. २६८ दि.१३/७/१० सादर,

विनंती रिपोर्ट करण्यात येतो की, कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ डॉक्टरांची आवश्यकता नेहमी भासते. आस्थापना सुचीवर बालरोग तज्ञाचे पद मंजुर नसल्यामुळे बालरोग तज्ञ डॉक्टरांची (ऑनररी बालरोग तज्ञ म्हणुन) मानधनावर नेमणुक करावी लागते.

कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे मानद बालरोग तज्ञ म्हणुन-

४) डॉ.श्री. सुभाष फिरोदिया. M.D.
५) डॉ. श्री. अनिरूध्द गिते. M.D.
६) डॉ. श्री. सुचित तांबोळी M.B.B.S. D.C.H., P.G.D., M.L.S.

यांची मा.स्थायी समिती ठराव क्र.११५ दिनांक ३१/०३/२०१० अन्वये प्रत्येकी दरमहा रू.१५००/- च्या मानधनावर दि.२५/१२/२००९ ते दि.२४/०६/२०१० अखेर सहा महिन्यांकरिता नेमणूक केलेली होती. सदरच्या नेमणूकीची मुदत दि.२४/०६/२०१० रोजी संपत आहे.

वरील तीन बालरोग तज्ञ डॉक्टरांनी त्यांची मुदत संपत आल्यामुळे कै.बा.दे. दवाखान्यामध्ये मानधनावर रूग्णांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी पुढील काळासाठी नेमणूक चालु ठेवण्याबाबत विनंती अर्ज दिलेले आहेत.

वरील बालरोग तज्ञ दवाखान्यातील नवजात अर्भकांची तपासणी करून औषधोपचार करतात. त्यामुळे दवाखान्यात येणा-या गरीब व गरजु रूग्णांना त्याचा जास्तीत जास्त फायदा होतो.

आपल्या दवाखान्यामध्ये प्रामुख्याने बाळंत केसेस असल्याने बालरोग तज्ञ असणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणुन हॉस्पीटलची व पर्यायाने पेशंटची गैरसोय होवु नये या करिता डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी या बालरोग तज्ञांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये दि.२६/०६/२०१० ते दि.२५/१२/२०१० अखेर सहा महिन्यांकरिता दरमहा रू.१५००/- च्या मानधनावर नेमणूक होणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रू.२७०००/- (रू. सत्तावीस हजार फक्त) च्या खर्चास मंजुरी मिळावी ही विनंती. आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा अहवाल असे.

मुख्य लेखा परिक्षक :- सदरचा विषय स्थायी समितीपुढे ठेवण्याची आवश्यकता आहे का ? याचा खुलासा करणे आवश्यक आहे. दि. २९/६/२०१०

चिफ मेडीकल ऑफिसर :-सादर, मुं.प्रां.मनपा अधि.१९४९चे कलम ५३(१)अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान मासिक वेतन भत्ते वगळून चारशे रूपये किंवा त्याहून अधिक आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्याची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

परंतु आयुक्ताला भत्ते वगळून चारशे रूपये किंवा त्याहून अधिक मासिक वेतन असलेल्या कर्ज विषयक कामासाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणूका सहामहिन्याहून अधिक नसलेल्या कालावधी साठी स्थायी समितीच्या पूर्व मंजूरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी नेमणूक करतांना त्याविषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहामहिन्याचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालकेच्या पुर्व मंजुरीवाचुन अशा कोणत्याही नेमणूकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त , नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळवण्याच्या अधिन यथास्थिती नगरपालिका मुख्य लेखा पक्षिक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहित असेल मात्र कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही. असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत, यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल.

परंतु कायम नेमणुकीच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजूर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरण पत्राच्या अधिन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्वमंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्याहून अधिक असेल अश्या कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि भत्ते वगळून शंभर रूपयाहून अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नविकरण करता येणार नाही.

तरी वरिल नियमाप्रमाणे कै.बा.दे. दवाखाना येथे बालरोगतज्ञ डॉक्टरांची तात्पुरती मानधनावर नेमणूक करावयाची असल्याने सदर विषय मा.स्थायी समिती समोर ठेवण्याची आवश्कयता आहे.

वरीलप्रमाणे खुलासा सविनय सादर.

मुख्य लेखा परिक्षक :- तीन डॉक्टर दि.२६/६/२०१० ते २५/१२/२०१० या सहा महिन्यासाठी दरमहा रू. १५००/- मानधनावर नेमणेबाबत विषय मा.स्थायी समिती पुढे चर्चेसाठी ठेवणेत यावा. दि. ८/७/२०१०/**अ**

मा. उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** नुसार प्रस्तावीत मान्यतेस्तव सादर. दि.१२/०७/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दिनांक १२/०७/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे बालरोग तज्ञांची मानधनावर नेमणूक करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते, व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची बालरोग तज्ञ म्हणून दिनांक २६/६/२०१० ते दि.२५/१२/२०१० अखेर सहा महिन्याकरिता दरमहा मानधन रूपये १५००/- (रूपये एक हजार पाचशे फक्त ) चे मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेस व त्याकामी येणारे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका